**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २८ | बुधवार,दि.१८ जून २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## जि.प.मध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्रावर नोकरी व पदोन्नती मिळविण्यांवर कधी होणार कारवाई ?

**गोंदिया–** शिक्षण आयुक्तालयाच्या वतीने राज्यातील राज्य प्रकल्प संचालक सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,शिक्षण संचालक,विभागीय शिक्षण उपसंचालकांना पत्र पाठवून दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळवलेल्या उमेदवारांची फेर वैद्यकीय तपासणी करुन खोट्या प्रमाणपत्रधारक उमेदवारावर कारवाई करण्याचे निर्देश २ जून २०२५ रोजी देण्यात आले आहेत.



राज्यात खूप मोठ्या प्रमाणात दिव्यांगत्त्वाचे बोगस प्रमाणपत्र घेऊन बरेच शासकीय, निमशासकीय सेवेत दाखल झालेले आहेत. बोगस प्रमाणपत्रांमुळे खऱ्या दिव्यांगांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आल्याने दि. १९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत “बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोध अभियान” राबविण्यात आले होते. सदर अभियानातून शासकीय व निमशासकीय सेवेत विविध विभागांमध्ये बोगस प्रमाणपत्राद्वारे नियुक्ती मिळालेल्या काही उमेदवारांची नावे निदर्शनास आली आहेत.

तसेच बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत नियुक्ती मिळिवल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.यामध्ये गोंदिया जिल्हा परिषदेत पाणी पुरवठा विभाग,लेखा विभाग,सामान्य प्रशासन,आरोग्य, शिक्षण विभागातही अशाच प्रकार घडल्याचेही वृत्त आहे.येत्या काही दिवसात तर काहींना दिव्यांग आरक्षणातून पदोन्नती सुध्दा देण्यात येणार असल्याचे वृत्त हाती आले असून जिल्हा परिषदेने अद्यापही दिव्यांग कर्मचाऱ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मेडीकल बोर्डाकडून सध्या स्थितिचे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात निर्देश दिले नसल्याचेही बोलले जात आहे.

शिक्षण विभागाकडून तर दिव्यांग कर्मचारी यांची माहिती सादर करण्यास टाळाटाळ केले जात असल्याचे समोर आले आहे.

त्यामुळे शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंग यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. १४ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देश व तरतुदीनुसार आपल्या कार्यालयामध्ये/विभागामध्ये दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे नियुक्त झालेल्या तसेच पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची खातरजमा करून घेऊन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

राज्यात मोठ्या प्रमाणात दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र देऊन बरेच उमेदवारी सरकारी व निमसरकारी सेवेत दाखल झालेत. अलिकडे पूजा खेडकर यांनी यूपीएससीची फसवणूक करून आयएएस पद मिळिवले होते. याची यूपीएससीने दखल घेऊन खेडकरवर कारवाई केली आहे. दिव्यांगाचे बोगस प्रमाणपत्रामुळे खऱ्या दिव्यांगावर अन्याय होत आहे. याकरिता जात पडताळणी समितीच्या धर्तोवर दिव्यांग पडताळणी समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

गोंदिया जिल्ह्यातील अनेक पात्र व खरे दिव्यांग असलेल्यांवर अन्याय झाला असून त्यांना पदोन्नती देतांना अडथळे सुध्दा निर्माण करण्यात येऊन पदोन्नतीकरीता ताटकळत बसावे लागले.तर काही दिव्यांगाना वाहन चालविण्याचा परवाना सुध्दा मिळू शकत नाही,अशाकंडे सुध्दा वाहन चालविण्याचा परवाना असल्याचे बोलले जात आहे.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्यावतीने अनेकदा दिव्यांग कर्मचारी यांची यादी सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्यानंतरही त्याकडे कानाडोळा करण्यामागचे रहस्य काय असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

दिव्यांगांना न्याय देण्यासाठी सदर संशयित उमेदवारांची दिव्यांगत्व तपासणी करून त्यातील सत्यता पडताळणी आवश्यक आहे. यादीतील उमेदवारांचे दिव्यांगत्व व दिव्यांग प्रमाणपत्र पुर्नतपासणी करून त्याची पडताळणी करण्यात आली. तसेच बोगस दिव्यांग सापडल्यास त्यांच्यावर कार्यवाही करून बर्डतर्फ करण्यात यावे. तसेच बोगस प्रमाणपत्र वितरीत करणाऱ्या शासकीय यंत्रणेतील आरोग्य विभागातील संबंधितांवर कारवाई करून गुन्हा दाखल करावे. मागील पंधरा वर्षात सरकारी, निमसरकारी सेवेत असलेल्या दिव्यांगांची फेर वैद्यकीय तपासणी करण्यात यावी, त्यात बोगस दिव्यांग आढळून आल्यास त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावे, अशी मागणी माजी आमदार बच्चू कडू यांनी केली होती.मात्र शासन पाहिजे त्या प्रमाणात कारवाईकरीता पुढाकार घेतांना दिसून येत नाही.

## केंद्र सरकारकडून जातनिहाय जनगणनेची अधिसूचना जारी

**३५ लाखांहून अधिक कर्मचारी काम करणार;**
**ॲपचा वापर होणार**



**नवी दिल्ली:–** देशात गेल्या काही महिन्यांपासून जात जनगणना आणि जनगणनेची चर्चा सुरू आहे. यासाठी राजपत्रित अधिसूचना जारी करण्यात आली आहे. लोकसंख्येची जनगणना २०२७ या वर्षात केली जाणार आहे. तत्पूर्वी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी जनगणनेच्या तयारीचा आढावा घेतला. त्यांनी केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन, महापंजीयन आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण आणि इतर अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

सरकारी निवेदनानुसार, ही जनगणना पूर्णपणे डिजिटल असणार आहे. यासाठी मोबाईल अ?प्स तयार केले जातील आणि त्यामध्ये जनगणनेशी संबंधित सर्व माहिती गोळा केली जाईल. हे अ?प्स १६ भाषांमध्ये उपलब्ध असणार आहेत. याबाबत केंद्रीय गृहमंत्री यांनी सोश मिडिया पोस्ट शेअर केली. यामध्ये म्हटले की, म१६ व्या जनगणनेत पहिल्यांदाच जातगणनेचा समावेश असेल. ३४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक, १.३ लाख जनगणना अधिकारी आधुनिक मोबाईल आणि डिजिटल उपकरणांसह हे काम करतील. जम्मू–काश्मीर आणि लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या केंद्रशासित प्रदेशांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ पासून आणि देशातील उर्वरित भागात १ मार्च २०२७ पासून जातीगणना आणि जनगणनेचे काम सुरू होईल. जनगणना दोन टप्प्यात केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात म्हणजेच घरांची यादी आणि गृहनिर्माण गणना प्रत्येक कुटुंबाची निवासी स्थिती, मालमत्ता आणि सुविधांची माहिती गोळा केली जाईल. त्यानंतर, दुसऱ्या टप्प्यात (लोकसंख्या गणना), प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक–आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर माहिती गोळा केली जाणार आहे. ही जनगणना भारताची १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असेल. यावेळी जनगणना मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. नागरिकांसाठी स्व–गणना सुविधा देखील उपलब्ध असेल. डेटा सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी संकलन, प्रसारण आणि साठवणूक करताना कडक सुरक्षा उपाययोजना केल्या जातील. शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती आणि ही जनगणना १६ वर्षांच्या अंतरानंतर केली जाणार आहे.

## गोंदियात ३६ सारस पक्ष्यांची नोंद?

**गोंदिया–.** देशातून लुप्त होत असलेल्या सारस पक्ष्यांचा अधिवास गोंदिया जिल्ह्यातील ठराविक भागात आहे. मात्र या पक्ष्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. गतवर्षी केलेल्या गणनेत जिल्ह्यात २८ पक्ष्यांची नोंद झाली. त्यानंतर सोमवारी (दि. १६) गोंदिया तालुक्यात सारस गणना करण्यात आली. त्यात १२ ठिकाणांवर ३६ सारस पक्ष्यांची नोंद करण्यात आली. परिणामी सारसप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. दरम्यान सेवा संस्थेच्यावतीने या आकडेवारीवर व पक्ष्यांचे स्थान प्रशासनतर्फे देण्यावर आक्षेप नोंदवण्यात आला आहे.



जिल्ह्यात आढळणाऱ्या सारस पक्ष्यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी सरकार आणि वनविभागाने पावले उचलली आहेत. गेल्या वर्षी झालेल्या सारस गणनेत जिल्ह्यात २८ सारस पक्ष्यांची नोंद झाली होती. त्यापैकी २६ गोंदिया वन परिक्षेत्रात होते. ही गणना पारंपरिक आणि शास्त्रीय पद्धतीने केली जाते. त्यामुळे सारस पक्ष्यांच्या संख्येचा अंदाज अचूक राहतो. विशेष म्हणजे राज्यातील गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातच सारस पक्ष्यांचे वास्तव्य आढळते. याशिवाय मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात बगळ्यांचे वास्तव्य आहे. १६ जून रोजी सकाळी ५ वाजता गोंदिया वनपरिक्षेत्र अधिकारी आणि परिसरातील सुमारे २५ ठिकाणी सर्व कर्मचारी, वन कर्मचारी संघटनेचे अधिकारी, पक्षीप्रेमी शेतकरी यांच्या उपस्थितीत बगळ्यांचे पक्षीगणना करण्यात आली.

येथे आहे सारसचा मुक्काम

झालेल्या सरस गणवेत तेढवा (मरारटोला) येथे २, दासगाव शेतशिवारातक ६, कडकणा परिसरात २. छिपिया तलाव परिसरात ४. सतोना वाघनदी परिसरात ८, शिवमंदिर कोका घाट परिसरात २. देवरी नदी घाट परिसरात १, धापेवाडा पंपहाऊस परिसरात १, बनायर (कोचेवाही) घाटावर ३, किन्ही घाटावर २, डांगोलीं घाट येथे २. खडबंदा तलाव परिसरात ३ अशा एकूण ३६ सारस पक्ष्यांची नोंद करण्यात आली. २०२३ मध्ये तालुक्यात १२, २०२४ मध्ये २३ आणि आता २०२५ मध्ये ३६ सारस पक्ष्यांची नोंद झाली. त्यामुळे वनविभाग आणि सारस पक्षीप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे

## जिल्हा बँकेच्या १७ जागेकरीता ३७ उमेदवार रिगणात,तीन उमेदवार निर्विरोध विजयी

### माजी आमदार राजेंद्र जैन, प्रफुल अग्रवाल व प्रमोद संगिडवार जिल्हा बँक निवडणूकीत निर्विरोध विजयी





**गोंदिया–**गोंदिया जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेची निवडणूक येत्या २९ जून २०२५ रोजी होणार आहे.त्याकरीता उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बँकेचे विद्यमान अध्यक्ष माजी आमदार राजेंद्र जैन हे पगारदार व इतर नागरी संस्था गटातून निर्विरोध निवडून आले.या गटातून काँग्रेसचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांचे पुत्र प्रफुल गोपालदास अग्रवाल यांनी आ–पला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

त्याचप्रमाणे वैयक्तिक गटातून काँग्रेस गटाचे जिल्हा बँकेचे विद्यमान संचालक प्रफुल गोपालदास अग्रवाल हे निर्विरोध निवडून आले असून या गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे निखिल राजेंद्र जैन यांनी आ–पला उमेदवारी अर्ज मागे घेतला.यापुर्वी अर्ज पडताळणीमध्ये देवरी तालुका सेवा सहकारी गटातून भाजपचे प्रमोद संगीडवार हे निर्विरोध निवडून आले होते.

या निवडणूकीत काँग्रेस राकाँ व भाजपचा प्रत्येकी एक संचालक निर्विरोध निवडून आला आहे.तर उर्वरित १७ जागांकरीता मात्र निवडणूक होणार आहे. सेवा सहकारी संघटना व काँग्रेस यांच्यात या निवडणुकीकरीता युती झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.त्यामुळे भाजप राष्ट्रवादीच्या महायुतीला फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.विशेष म्हणजे अनु.जाती/जमाती गटात आजी माजी आमदारामध्ये चुरस होणार आहे.तर तिरोडा सेवा सहकारी गटात विद्यमान आमदार विजय रहांगडाले यांच्या विरोधात काँग्रेसच्या वंदना हेमराज अंबुले रिंगणात असून या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे.

**सेवा सहकारी गट** गोंदिया तालुका–सहकार पॅनलच्यावतीने केतन शिवशंकर तुरकर तर परिवर्तन पॅनलच्यावतीने संजय चौधरी,सेवा सहकारी गट आमगाव तालुका–सहकार पॅनलच्यावतीने भैरसिंह नागपुरे तर परिवर्तन पॅनल समर्थित सुभाष आकरे,सालेकसा तालुका सहकार पॅनलचे प्रभाकर दोनोडे व परिवर्तन पॅनलचे येजेंद्रकुमार कटरे,देवरी तालुका– प्रमोद संगिडवार,सडक अर्जुनी तालुका सहकार पॅनलचे गजानन परशुरामकर तर परिवर्तन पॅनलचे गंगाधर परशुरामकर,गोरेगाव तालुका– परिवर्तन पॅनल समर्थित दुर्गाप्रसाद ठाकरे तर सहकार पॅनलचे योगराज पारधी,तिरोडा तालुका परिवर्तन पॅनलकडून श्रीमती वंदना अंबुले तर सहकार पॅनलकडून विजय भरतलाल रहागंडाले व अर्जुनी मोरगाव तालुका गटातून सहकार पॅनलकडून केवलराम पुस्तोडे,परिवर्तन पॅनलकडून मोरेश्वर कोरे व विजयाबाई दयाराम कापगते अपक्ष रिंगणात आहेत.

**औद्योगिक गटातून** सहकार पॅनलकडून रेखलाल टेंभरे तर परिवर्तन पॅनलकडून अरुणकुमार दुबे,**जंगलकामगार सहकारी संस्था गटातून** परिवर्तन पॅनलकडून अशोक गुप्ता,सहकार पॅनलकडून अजयसिंह गौर व मृत्युंजय सिंह रिंगणात आहेत.**डेअरी गटातून** सहकार पॅनलकडून राजकुमार कुथे तर परिवर्तन पॅनलकडून पंकज यादव रिंगणात आहेत.**मत्स्यव्यवसाय गटातून** सहकार पॅनलकडून सावलराम मारबते तर परिवर्तन पॅनलकडून अजय हलमारे,**मजुर सहकारी संस्था** गटातून सहकार पॅनलकडून राजू नेमिचंद जैन तर परिवर्तन पॅनलकडून विजयकुमार राठोड,**पगारदार गटातून** राजेंद्र हिरालाल जैन,**वैयक्तीक गटातून** प्रफुल गोपालदास अग्रवाल,**अनु.जाती जमाती गटातून** सहकार पॅनलकडून राजकुमार बडोले तर परिवर्तन पॅनलकडून दिलीप बनस–ोड,**महिला राखीव गटातून** सहकार पॅनलकडून रचना गहाणे,प्रिया हरिणखेडे तर परिवर्तन पॅनलकडून ज्योती पटले व उषा मेंढे रिंगणात आहेत.

**व्हीजेएनटी गटातून** सहकार गटातून विनोद कन्नमवार,परिवर्तन पॅनलकडून दामोदर नेवारे,अपक्ष रघुनाथ मेश्राम रिंगणात आहेत.तर **ओबीसी गटातून** परिवर्तन पॅनलकडून राधेलाल पटले तर सहकार पॅनलकडून डॉ.अविनाश जायस्वाल रिंगणात आहेत.

### तीन तालुक्यात बंडखोरी: भाजपपुढे आव्हान

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वच मतदार संघात चुरसीची निवडणूक होणार असून तालुका सहकारी मतदार संघात बंडखोरी झाल्याने भाजपपुढे आव्हान उभे झाले आहे. गोरेगाव तालुका सेवासहकारी मतदार संघातून भाजपचे दुर्गाप्रसाद ठाकरे व आमगाव तालुका सेवा सहकारी मतदार संघातून भाजपचे वरिष्ठ सहकार नेते सुभाष आकरे हे काँग्रेसप्रणित परिवर्तन पॅनलकडून रिंगणात आहेत.

तर भाजपचे माजी आमदार स्व.दयाराम कापगते यांच्या पत्नी विजयाताई कापगते यानी सेवा सहकारी गटातून उमेदवारी कायम ठेवल्याने भाजपच्या अधिकृत उमेदवारासमोर आवाहन उभे झाले आहे.

## नेत्रदान मोहिमेत विदर्भात गोंदिया चौथा

**गोंदिया :** नेत्रदानाला सर्वात श्रेष्ठदान म्हटले जाते.ज्या कोणाला नेत्र मिळाले तर त्याला नवीन जीवन मिळत असते. हे दान करण्यात आता आदिवासी व नक्षलग्रस्त म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्याने सुध्दा आघाडी घेतली आहे.जिल्हा सामान्य रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून गोंदिया जिल्ह्यात २०१८ पासून आजपर्यंत ३४० जणांनी नेत्रदान केले आहे.तर २०२५ मध्ये गोंदिया जिल्हा नेत्रदानात विदर्भात चौथ्या क्रमांकावर आहे.२०२४–२५ यावर्षी ६६ जणांनी १३२ कोर्निया दिले.२०२२–२३ मध्ये २२ जणांनी ४४ तर २०२३–२४ मध्ये १६ जणांनी ३२ कोर्निया दिले.



जागतिक नेत्रदान दिन १० जूनला जगभर साजरा केला जातो. नेत्रदानासाठी जनजागृती व्हावी यासाठी अनेक कार्यक्रम होत असतात. राज्यात वर्षभरात २ हजार ५४३ जणांनी आपले एकूण ५ हजार ८६ डोळे दान केले आहेत. यापैकी ३ हजार ९७ डोळ्यांचे प्रत्यारोपण करण्यात आले आहे.राज्यात गोंदियासह ७८ नेत्रपेढी सक्रिय असून १४६ नेत्र प्रत्यारोपण केंद्रांची नोंद शासनाकडे आहे.

गोंदिया जिल्ह्यात नेत्रदान करणयाची सुरवात गोंदियातील स्व.प्रमोद अग्रवाल यांच्यापासून झाली.त्यानंतर जुगलकिशोरजी अग्रवाल यांनी स्व.प्रमोद मेमोरीयल ट्रस्टची स्थापना करुन लोकामध्ये नेत्रदानप्रती जनजागृतीचे कार्यकरीत नेत्रदान मोहिमेत सहभाग घेतला.आता शासकीय रुग्णालय व शासकीय वैद्यकिय महाविद्यालयातर्फे ही मोहीम राबविण्यात येत आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यात जिल्हा सामान्य रुग्णालयात खास नेत्रदानासाठी समुपदेशकांची नेमणूक करण्यात आली आहे. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होताच त्याच्या कुटुंबीयांना नेत्रदान करण्याबाबत मार्गदर्शन करणं, नेत्रदाचं महत्व पटवून सांगण्याची जबाबदारी या समुपदेशकांची असते.

### नेत्रदान करायचे आहे तर

कुठल्याही वयाची व्यक्ती नेत्रदान करू शकते. नेत्रदान हे मृत्यूनंतर सहा ते आठ तासात करता येते. ज्या ठिकाणी व्यक्तीचा मृत्यू झाला त्या ठिकाणी रक्तपेढीचे प्रतिनिधी येतात. मृत व्यक्तीचे डोळे काढण्याची प्रक्रिया ते मृत व्यक्तीच्या घरीच करतात. नेत्रदान करण्यासाठी ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याचे डोळे लगेच बंद करावे लागतात.

त्यानंतर डोळ्यांवर ओल्या कापसाचे बोळे ठेवावेत. डोक्याखाली दोन उषा ठेवायच्या. घरापासून जी सर्वात जवळ नेत्र पिढी आहे, त्यांना याबाबत संपर्क करावा. संबंधित व्यक्तीचा मृत्यू कशामुळे झाला याबाबत एमबीबीएस डॉक्टरचे प्रमाणपत्र नेत्रदानापूर्वी मिळवणे आवश्यक आहे. नेत्रपेढीचे पथक आल्यावर ते नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण करून या नेत्रांचे प्रत्यारोपण दुसऱ्या व्यक्तीला त्वरित करण्यासाठी ते पुढची प्रक्रिया करावी लागते.गोंदिया जिल्हा सामान्य रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सयुंक्तरित्या हे काम गोंदियात करीत आहे,अशी माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कुसुमागर घोरपडे यांनी दिली.

यांचे नेत्रदान अशक्य : ज्या व्यक्तीचे नेत्रदान करायचे आहे, त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण कळणे हे नेत्रदानासाठी अतिशय आवश्यक आहे. जर एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूचे कारण कळले नसेल तर त्या व्यक्तीचे नेत्र घेतले जात नाही.

यासोबतच मेंदू संदर्भातील विकार, मेंदूज्वर, रक्ताचा कर्करोग, मेंदूला आलेली सूज, याकृताला आलेली सूज, कोरोना, रेबीज, क्षयरोग, एचआयव्ही अशा एकूण विविध २० आजारांमुळे मृत्यू झालेल्या व्यक्तींना नेत्रदान करता येत नाही. अनेकांना कोणत्या व्यक्तीचे नेत्रदान करता येते आणि कोणत्या व्यक्तीचे करता येत नाही याची माहिती नसल्यामुळे अनेकदा एखाद्या मृत व्यक्तीचे डोळे घेऊन ते कुठल्याही उपयोगात येत नाही. त्यामुळे मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी आणि नेत्रपेढीच्या प्रतिनिधींना खात्री करूनच संपूर्ण प्रक्रिया करावी लागते.सौ.भाविका बघेले(नागपूरे)समुपदेशक नेत्रपिढी गोंदिया

## आश्रमशाळेतील नर्स भरतीत घोळ

**गोंदिया–.** एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी देवरीद्वारे विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात. त्यामध्ये शासकीय आश्रमशाळा चालविण्यात येते. या शासकीय आश्रमशाळेत बाह्यस्त्रोताद्वारे सरकारने नर्स पदभरतीसाठी बाह्यस्त्रोताला परवानगी दिली होती. गोंदिया जिल्ह्यात १२ शासकीय आश्रमशाळांमध्ये सदर पदभरतीसाठी बाह्यस्त्रोताने जाहिरात दिली. मात्र नियुक्तीच्या वेळी यामध्ये मोठा घोळ सुरू झाल्याचा आरोप यावेळी स्थानिक उमेदवारांनी केला.





विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविण्यासाठी शासकीय आश्रमशाळेत नर्स पदाची भरती बाह्यस्त्रोताद्वारे शासनाने सुरू केली होती. यात गोंदिया जिल्ह्यातील १२ शासकीय आश्रमशाळांच्या समावेश होता. यामध्ये मात्र बाह्यस्त्रोताने नेमणूक करताना स्थानिक उमेदवाराला प्राधान्य न देता आणि यादीत नाव असूनही त्यांना डावलून इतर उमेदवारांना पैसे घेऊन नियुक्ती दिल्याचा आरोप यावेळी उमेदवारांनी केला. मोठ्या प्रमाणात पैशाची मागणी करून नेमणूक

करण्यात आली. आम्ही पैसे दिले नाही म्हणून आमचे नाव यादीतून वगळल्याचा आरोप यावेळी पदभरतीसाठी आवेदन केलेल्या महिलांनी केला. याविषयीची तक्रार त्यांनी देवरी प्रकल्प अधिकाऱ्यांसह विविध ठिकाणी केली. स्थानिक उमेदवारांना डावलून ज्यांनी पैसे पुरविले अशांची नियुक्ती केल्याचा आरोप करण्यात आला.

**नर्स पदाची भरती करण्याचे काम बाह्यस्त्रोत यंत्रणेद्वारे करण्यात आले. या प्रक्रियेत घोळा झाला असेल तर चौकशी करण्यात येईल. यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात येईल.**

**उमेद काशिद,**
**प्रकल्प अधिकारी, देवरी**

या प्रकरणीर आता काय निर्णय घेतला जाते, हे बघावे लागणार आहे. मोठ्या प्रमाणात देवाण–घेवाण होऊन पात्र असूनही यादीतून नाव कापसल्याचा आरोप स्थानिक उमेदवारांनी केला.

## संपादकीय

### प्रत्येकाला समाजभान असणे आवश्यक

काही व्यक्ती मिळून कुटुंब बनते आणि अनेक कुटुंबांचा समाज बनतो.समाज हा लोकांचा एक समूह आहे जो एकमेकांना जीवन जगण्यात आणि त्याची परिस्थिती सुधारण्यासाठी,मदत करण्यासाठी एकत्र राहतो.व्यक्ती म्हणून जसे आपले काही वैयक्तिक कर्तव्य आपण पार पाडत असतो, तसेच समाज (समूह) म्हणून सुद्धा आपली प्रत्येकाची काही कर्तव्ये असतात.ती पार पाडलीच पाहिजे असे जरी आपल्यावर बंधन नसले तरी माणुसकी,मानवता,मानवधर्म म्हणून ती कर्तव्ये पार पाडणे एक समाज घटक म्हणून आपली जबाबदारी असते व ती जबाबदारी पार पाडण्याचा जर प्रत्येकाने प्रयत्न केला तर समाजात घडणाऱ्या बऱ्याच दुःखद,वाईट,घृणास्पद,वेदनादायी घटना आपण थांबवू शकतो.प्रत्येक वेळी जर आपण सरकारकडे बोट दाखवत असू आणि सरकार काहीतरी निर्णय घेईल म्हणून वाट बघत असू तर अजूनही आपण स्वतःला समाजाचे घटक समजत नाही आणि आपल्याला अजूनही समाजभान आलेले नाही असे म्हटले तरी काही वावगे होणार नाही.

आपल्या अवतीभोवती समाजामध्ये दररोज काही ना काही अप्रिय घटना घडत असतात.त्या कोणत्या ना कोणत्या माध्यमातून आपल्या कानापर्यंत पोहोचतात. वृत्तपत्रे,टीव्ही चॅनेल,सोशल मीडिया, लोकांची चर्चा यामधून देश,राज्य, आपला परिसर या सर्व ठिकाणी मन हेलावून टाकणाऱ्या अनेक धक्कादायक घटना आपल्या कानावर पडतात.या घटना आपल्यासारख्याच कोण्या तरी व्यक्तीच्या कुटुंबात घडलेल्या असतात.त्या घटनेमुळे त्या कुटुंबावर खूप मोठा आघात झालेला असतो व ते कुटुंब दुःखाने होरपळून निघालेले असते.अशावेळी त्या कुटुंबाला मानसिक आधाराची नितांत आवश्यकता असते.हा आधार त्यांचे नातेवाईक किंवा जवळच्या मित्रांकडून मिळत असतो.परंतु समाज म्हणून आपली सुद्धा काही जबाबदारी असते.आपण प्रत्यक्ष त्या कुटुंबाला भेटू शकत नाही किंवा त्यांना मदत करू शकत नाही,परंतु घटना कितीही लांब जरी घडलेली असली तरी त्या घटनेच्या संदर्भात आपली प्रतिक्रिया मात्र आपण नक्कीच देऊ शकतो.प्रत्येकच घटनेवर आपण प्रतिक्रिया देऊ शकत नाही परंतु बलात्काराच्या घटना,वैष्णवी हगवणे सारख्या मन सुन्न करणाऱ्या घटना, कित्येक स्त्रियांना जाळून टाकण्याच्या घटना,संतोष देशमुख सारख्या अमानुषपणे हत्या करण्याच्या घटना,राजकीय नेत्यांच्या लज्जास्पद कृती, सामाजिक,राजकीय,धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचे भ्रष्टाचार किंवा घृणास्पद कृत्य अशा बऱ्याच प्रकारच्या अतिशय निंदनीय आणि समाजमन हादरवून टाकणाऱ्या घटना आपल्या अवतीभोवती नेहमी घडत असतात.

अशावेळी आपण काहीतरी भूमिका घेणे फार महत्त्वाचे असते.कारण ही भूमिका घेतल्यानंतर अन्याय करणाऱ्याच्या विरोधात जनमत तयार होते.सरकार ॲक्शन मोडवर येते आणि जनमताच्या दबावामुळे सरकारला अन्यायी, गुन्हेगार व्यक्तीवर कारवाई करावी लागते.लोकांचा दबाव जर नसला तर अनेकदा कारवाई होत नाही कारण काही गुन्हेगारांचे राजकीय संबंध किंवा पैशामुळे फार मोठे दबाव तंत्र असते.त्यामुळे पोलीस त्यांच्यावर कारवाई करत नाही.परंतु समाजाने जर उठाव केला,निषेध व्यक्त केला, निवेदने दिली,मोर्चे काढले,आंदोलन केले तर निश्चितपणे समाजमन ढवळून निघते आणि त्या पीडित कुटुंबाला सुद्धा आपल्या पाठीशी कोणीतरी आहे असे वाटते आणि आपण आता आपल्यावर अन्याय करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात ताकतीने लढू शकतो अशी हिम्मत निर्माण होते.म्हणून समाज किंवा समूहाची ताकद ही वैयक्तिक ताकदीपेक्षा खूप जास्त असते.त्यामुळे समाज घटक म्हणून अशा वाईट घटनेबद्दल देशाचे जागृत नागरिक म्हणून आपले मत व्यक्त करणे,आपली प्रतिक्रिया देणे,त्याबद्दल लिखाण करणे,मुलाखत देणे,काही सामाजिक संघटना निवेदन किंवा आंदोलन करत असतील तर त्यांच्यासोबत सहभागी होणे व आपणही या वाईट कृत्याच्या विरोधात आहोत असे जाहीरपणे जर दाखवले तर निश्चितच एक चांगला समाज निर्माण होण्यासाठी आपली प्रत्येकाची मदत होऊ शकते. समाजाला लज्जीत करणाऱ्या घटनांवर जर आपण कोणतीही भूमिका न घेता चुपचाप बसलो तर ते जिवंतपणाचे लक्षण नाही.शरीराने जरी आपण जिवंत असलो तरी वैचारिकदृष्ट्या,सामाजिकदृष्ट्या मात्र आपण मृत आहोत असा त्याचा अर्थ होतो.

सामाजिक भान असलेल्या समाजाची ताकद प्रचंड असते. समाजाच्या आवाजात दम असतो.अन्यायी,अत्याचारी,गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या विरोधात जर सामूहिकदृष्ट्या आवाज उठवल्या गेला तर निश्चितपणे आपण गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालू शकतो व आपल्या प्रत्येकावर कधी ना कधी येणाऱ्या संकटाला थोडेफार का होईना निश्चितपणे रोखू शकतो. त्यामुळे आपल्या कुटुंबावर संकट किंवा वाईट प्रसंग येईपर्यंत वाट न बघता, ज्याच्यावर संकट आले आहे तो व्यक्ती जरी आपल्या परिचयाचा नसला तरी एक समाज घटक म्हणून आपण जागृत नागरिक या नात्याने सामूहिक भूमिका घेतली पाहिजे. संकट प्रत्येकाच्या दारापर्यंत येऊन ठेपलेले आहे.अशा भीषण आणि भयानक परिस्थितीमध्ये सामुदायिक भूमिका घेण्याची प्रत्येकाला नितांत आवश्यकता आहे.तरच आपण समाजात दररोज घडणाऱ्या अत्यंत दुःखद आणि वेदनादायी घटना काही प्रमाणात थांबवू शकतो.

**प्रेमकुमार बोके**
**अंजनगाव सुर्जी**

# हवामान बदल: प्राण्यांसाठी संकट...



"ओएसयू कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री' आणि मेक्सिकोच्या संशोधकांनी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या जैवविविधता डेटासेटचा वापर करून ३५ विद्यमान वर्गांमधील ७० हजार ८१४ प्रजातींच्या प्राण्यांच्या डेटाचे परीक्षण केले. "इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर'(आययूसीएन)ने केलेल्या मूल्यांकनानुसार, संशोधकांनी वर्ग आणि हवामानबदलाच्या धोक्यांच्या आधारावर प्रजातींचे विभाजन केले. या वर्गांमध्ये अर्कनिड्स आणि चिलोपोडन्स (सेंटीपीड्स) तसेच अँथोझोअन्स आणि हायड्रोझोअन्स (जेलीफिश आणि कोरलशी संबंधित सागरी अपृष्ठवंशी प्राणी) यांचा समावेश आहे. इतर वर्गांमधील प्रजातींचे प्रमाण खूपच कमी आहे, जे तापमान वाढीच्या हवामानामुळे थेट धोक्यात आहे.

संशोधकांना समुद्रातील अपृष्ठवंशी प्राण्यांबद्दल विशेष काळजी आहे, जे हवामान बदलामुळे होणारी बहुतेक उष्णता शोषून घेतात. हे प्राणी अधिकाधिक असुरक्षित होत आहेत कारण त्यांची हालचाल करण्याची आणि प्रतिकूल परिस्थितीतून लवकर बाहेर पडण्याची क्षमता मर्यादित आहे. हवामान बदलामुळे मानव आणि वन्य प्राण्यांमधील संघर्ष वाढत आहे. उष्णतेच्या लाटा, वणवे, दुष्काळ आणि पूर यांसारख्या घटनांमुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होऊ शकतात. परागण आणि परजीवीवाद यांसारख्या प्रजातींच्या अंतर्गत परस्पर संवादावरदेखील परिणाम होण्याची शक्यता आहे, जे परिसंस्थेच्या कार्यासाठी आवश्यक आहेत. मानवनिर्मित सीमा आणि हवामानबदल वन्यजीव धोक्यात वाढ करतात.

संशोधकांनी म्हटले आहे की, पाण्याच्या वाढत्या तापमानामुळे इस्रायलच्या किनाऱ्यावरील मोलस्क प्राण्यांच्या संख्येत नव्वद टक्के घट होणे अपृष्ठवंशी प्राणी किती असुरक्षित आहेत, हे दर्शवते. इतर उदाहरणांमध्ये २०२१च्या पॅसिफिक नॉर्थवेस्ट हीट डोम दरम्यान अब्जावधी इंटरटाइडल इनव्हर्टेब्रेट्सचा मृत्यू आणि २०१६ मध्ये आलेल्या तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेनंतर ग्रेट बॅरियर रीफच्या २९ टक्के भागात कोरलचा विनाशकारी मृत्यू यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात मृत्यूदर हा फक्त अपृष्ठवंशी प्राण्यांपुरता मर्यादित नाही. २०१५ आणि २०१६ मध्ये उत्तर अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सुमारे ४० लाख कॉमन मुरे हे तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेमुळे, बदलत्या अन्नजाळ्यामुळे आणि उपासमारीने मृत्युमुखी पडले. त्याच उष्णतेच्या लाटेमुळे पॅसिफिक कॉडमध्ये ७१ टक्के घट झाली, कारण चयापचय मागणी वाढली आणि शिकार बेस कमी झाला. उत्तर पॅसिफिकमध्ये सुमारे ७,००० हंपबॅक व्हेलच्या मृत्यूमागे सागरी उष्णतेच्या लाटांची भूमिका असू शकते.

वन्यजीवांना असलेल्या हवामान बदलाच्या धोक्यांबद्दल गोळा केलेली माहिती तुलनेने कमी आहे. बहुतेक वन्य जीव वर्गांचे (१०१ पैकी ६६) अद्याप ङ्गआययूसीएनफ्ने कोणत्याही प्रजातीचे मूल्यांकन केलेले नाही. आज जिवंत वन्य जीव प्रजातींपैकी मूल्यांकन केलेल्या ७० हजार ८१४ प्रजाती सुमारे ५.५ टक्के आहेत. हवामान बदलामुळे बंगालच्या उपसागरात ऑक्सिजनची कमतरता वाढत आहे, मृत क्षेत्रे तयार होत आहेत.

अभ्यास संशोधनात केलेले विश्लेषण हे वन्य जीव प्रजातींना असलेल्या हवामानाच्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याचा एक प्रारंभिक प्रयत्न आहे. माहितीपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी धोके समजून घेणे महत्त्वाचे आहे. सर्व परिसंस्थांमध्ये प्राण्यांच्या प्रजातींसाठी हवामान बदलामुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणात मृत्यूदराच्या घटनांवर जागतिक डेटाबेस आवश्यक असून सध्या दुर्लक्षित प्रजातींचे मूल्यांकन जलद करणे आवश्यक आहे. सर्व प्रजातींना हवामानामुळे होणाऱ्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याची आणि अनुकूलन क्षमतेचा चांगल्या प्रकारे विचार करण्याची आवश्यकता आहे, असे संशोधकांनी पेपरमध्ये म्हटले आहे. जैवविविधता आणि हवामान बदल धोरण नियोजन जगभरात एकत्र आणण्याची आवश्यकता आहे.

एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. गोड्या पाण्यातील ६४ परिसंस्था पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या एक टक्क्यापेक्षा कमी भाग व्यापतात; परंतु त्या ग्रहावरील जीवनासाठी महत्त्वाच्या आहेत. नवीन संशोधनातून दिसून आले आहे की, वातावरणाचे नुकसान गोड्या पाण्यातील जीवसृष्टीला नष्ट होण्याच्या जवळ पोहोचवत आहे. २४ टक्के प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. मासे, खेकडे आणि ड्रॅगन फ्लायच्या हजारो प्रजाती येत्या काही दशकांमध्ये नामशेष होऊ शकतात. गोड्या पाण्यातील सुमारे २४ हजार प्रजातींच्या आरोग्याच्या एका महत्त्वाच्या मूल्यांकनात आढळून आले आहे की, सुमारे एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याच्या स्थितीत आहेत. यापैकी सुमारे एक हजार प्रजाती अत्यंत धोक्यात असल्याचे मानले जाते, तर २०० आधीच नामशेष होण्याची शक्यता आहे. हे आकडे हिमनगाचे फक्त टोक आहे. गोड्या पाण्यातील जैवविविधता जपणे हे जागतिक आव्हान आहे. कारण हजारो प्रजातींच्या नामशेष होण्याचा धोका योग्यरीत्या समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांकडे आवश्यक ती माहिती नाही. या प्राण्यांना समजून घेण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कृती करण्याची आवश्यकता आहे, असे अभ्यासाच्या प्रमुख लेखक कॅथरीन सेयर म्हणतात. गोड्या पाण्यातील भूदृश्ये पृथ्वीवरील सर्व ज्ञात प्रजातींपैकी दहा टक्के प्रजातींची घरे असून अब्जावधी लोकांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी, उपजीविका, पूर नियंत्रण आणि हवामानबदल कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष ङ्गनेचर जर्नलफ्मध्ये प्रकाशित झाले.

जमिनीवरील सर्व जीवांसाठी ताजे, स्वच्छ पाणी महत्त्वाचे असले, तरी गोड्या पाण्यातील परिसंस्था पृथ्वीवर सर्वात धोक्यात आहे. अन्न, पाणी आणि संसाधनांची मागणी वाढत असताना गोड्या पाण्यातील पर्यावरण वाढत्या दबावाखाली आहे. दलदल, खारफुटी आणि खाऱ्या दलदलींसह विशेषतः पाणथळ जागा या नुकसानाचा फटका सहन करत आहे. एका अंदाजानुसार १७०० पासून भारताच्या आकारमानाइतके क्षेत्र म्हणजे तब्बल ३.४ दशलक्ष चौरस किलोमीटर पाणथळ जागा नष्ट झाल्या आहेत. वुडविले कार्स्ट केव्ह क्रेफिश फ्लोरिडाच्या फक्त एकाच भागात आढळते, जिथे त्याला प्रदूषण आणि अधिवासाचा ऱ्हास यांसारख्या धोक्यांचा सामना करावा लागतो. पाणथळ जागांचा नाश केवळ तेथे राहणाऱ्या प्राण्यांना आणि वनस्पतींनाच हानी पोहोचवत नाही, तर हवामान बदलाशी लढण्याची आणि पूर रोखण्याची क्षमतादेखील मर्यादित करतो.

गोड्या पाण्याचे स्रोतदेखील अनेक आव्हानांना तोंड देत आहेत. नद्यांवर पाणी साठवणे आणि धरणे वन्यजीवांसाठी उपलब्ध अधिवास कमी करत आहेत. कोलोरॅडो नदीसारख्या काही नद्या आता समुद्रापर्यंत पोहोचत नाहीत. या कमी होत चाललेल्या अधिवासांमध्ये राहणारे प्राणी सांडपाणी, औद्योगिक आणि प्लास्टिक प्रदूषणामुळे प्रभावित होतात. महासागरांपेक्षा गोड्या पाण्याच्या वातावरणाचा अभ्यास खूपच कमी केला गेला आहे. निरोगी गोड्या पाण्यातील परिसंस्थांना पाठिंबा देण्यासाठी गोड्या पाण्यातील प्रजातींचा डेटा संवर्धन धोरणांमध्ये आणि पाणी वापर व्यवस्थापनात सक्रियपणे समाविष्ट करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व प्रजातींपैकी सुमारे दहा टक्के गोड्या पाण्यावर अवलंबून असताना केलेला अभ्यास विशेषतः चार गटांशी संबंधित होता जे जवळून संबंधित आहेत. डेकापॉड्स हा क्रस्टेशियन्सचा एक मोठा गट आहे, ज्यामध्ये खेकडे, कोळंबी, क्रेफिश, कोळंबी आणि लॉबस्टर यांचा समावेश आहे.

अनेक प्रजाती समुद्रात राहतात, तर काही जगभरातील नद्या आणि ओढ्यांमध्ये राहतात, जिथे सुमारे तीस टक्के प्रजाती नाम शेष होण्याचा धोका आहे. डेकापॉड्ससाठी प्रदूषण हा सर्वात मोठा धोका आहे. कीटकांना मारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक कीटकनाशकांमुळे जलमार्गांमध्ये खेकडे आणि कोळंबी माशांचेही नुकसान होते. विशेषतः हे प्राणी त्यांचे पंख सोडतात तेव्हा धोका वाढतो. ही रसायने माशांनादेखील धोका निर्माण करतात आणि त्यांच्या विकासावर, प्रजननक्षमतेवर आणि वर्तनावर परिणाम करू शकतात. ओडोनेट्स हा कीटकांचा एक गट आहे. त्यामध्ये ड्रॅगनफ्लाय आणि डॅमसेल्फलाई यांचा समावेश आहे. ते हवाई भक्षक म्हणून सर्वात जास्त ओळखले जाऊ शकतात, तरी हे प्राणी त्यांचे बहुतेक आयुष्य गोड्या पाण्यातील नवजात शिशू म्हणून घालवतात. धोक्यात असलेल्या अर्ध्याहून अधिक प्रजाती जमिनींचे शेतीत रूपांतर झाल्यामुळे त्यांच्या अधिवासाचे नुकसान होण्याचा धोका वाढतो. शहरीकरण, हवामानबदल आणि वन्यजीव संवर्धन यांच्यात संतुलन कसे राखायचे हा आजचा मोठा प्रश्न आहे. एका संशोधनात आढळून आले की, सहा वेगवेगळ्या वर्गांच्या किमान एक चतुर्थांश प्रजातींना हवामान बदलाचा धोका आहे. आतापर्यंत अतिशोषण आणि अधिवास नष्ट होणे जैवविविधतेच्या नुकसानाचे पहिले कारण मानले जात होते; परंतु हवामान वेगाने बदलणे पृथ्वीवरील प्राण्यांसाठी तिसरे सर्वात मोठे संकट बनेल.

**मिलिंद बेंडाळे**

# १७६६ पैकी तब्बल ६४० कर्मचाऱ्यांचे पदे रिक्त



**गोंदिया** : दखल घेवून उपचार करणारा आरोग्य विभागच आजारी पडला असेल तर ग्रामीण भागातील जनतेने रुग्णसेवेची अपेक्षा कशी करावी? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातंर्गत जिल्ह्यात ४० आरोग्य केंद्रत २६३ उपकेंद्र संचालित आहेत. मात्र या आरोग्य संस्थाच्या माध्यमातून सेवा पुरविण्यासाठी आरोग्य विभागाचा रिक्त पदांमुळे कोंडमारा होत आहे. तब्बल ६४० कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत.

गोंदिया जिल्ह्याचा ९० टक्के क्षेत्र ग्रामीण भागात मोडतो. त्यातल्यात्यात जिल्ह्यातील अनेक तालुके अतिदुर्गम व नक्षलग्रस्त देखील आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवेसाठी कमालीचा त्रास सहन करावा लागतो शासनाकडून प्रामीण क्षेत्रातील

नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, चाकरीता आरोग्य संस्था उभारण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य संस्थावर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून नियंत्रण ठेवले जाते. जिल्हगत ४० प्राथमिक आरोग्य केंद्र व २६.३ उपकेंद्र, २७ आयुर्वेदिक दवाखाने, ३ फिरते पथक आहेत या संस्थांच्या माध्यमातून सेता पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे १७६६ पदे मजूर आहेत. यातील फक्त १९१८ पढे भरलेली आहेत. तर ६४० पदे रिक्त आहेत.

यामुळे रिक्त पदांच्या ओझ्याखालीच जिल्हा परिषदेचा आरोग्य विभान सेवेचा गाडा ओढत आहे.त्यातल्यात्यात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवश्यावर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचा कारभार सुरू आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य विभागाकडून दर्जेदार रुग्णसेवेची अपेक्षा कशी करावी? असा प्रश्न निर्माण झाला असून पदभरतीकरीता शासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी होत आहे.

# जि.प.उपाध्यक्ष हर्षे यांच्या हस्ते रस्ता खडीकरणाचे भूमिपूजन

**आमगाव** : तालुक्यातील रिसामा गावात नवीन वसाहतीच निर्माण होत असतााना कॉलोनीमध्ये आगमनाकरीता कच्चे रस्ते असल्यामुळे नागरिकाना त्रास होत असते.त्यामुळे या परिसरात रस्ता बांधकामाची मागणी खासदार प्रफुल पटेल व माजी आमदार राजेन्द्र जैन यांच्याकडे करण्यात आली होती.त्या मागणीकडे लक्ष देत नागरी सेवा सुविधे अंतर्गत १० लक्ष मंजूर करुन सदर रस्ता खड़िकरणाचे काम जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांच्या हस्ते भूमिपूजन करुन करण्यात आले.यावेळी बाजार समितीचे माजी सभापती टिकाराम मेंढे,आमगाव राकाँपा अध्यक्ष कमलबापू बहेकार,रवि क्षिरसागर,राजेश भक्तवर्ती,रमन डेकाटे,प्रमोद शिवनकर,अनिल शर्मा, सुभाष येवलकर, धनीराम बिसेन, संतोष श्रीखंडे, पियुष झा, गुड्डू मेंढे, ऋषि शर्मा ,रिसामा येथील हिरासिंह कनपुरिया सुरेश डोंगरे, पंचाराम मडावी, दिनेश वलथरे, भुते, दिलीप चंदेल, अशोक वर्गणंटवार, टुंडीलाल गौतम, टेकचंद कटरे, मनिषा कनपुरिया, डोंगरे व समस्त इतर उपस्थित होते.



### २५ वारकऱ्यांची दिंडी १८ जून रोजी प्रस्थान करणार

**गोंदिया**– जिल्हा वारकरी सांप्रदायाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी नवेगाव बांध येथून २५ वारकऱ्यांची दिंडी १८ जून रोजी सकाळी ७ वाजता आळंदीकडे प्रस्थान करणार आहे. या दिंडीचे नेतृत्व माजी जिल्हा परिषद सदस्य व वारकरी सांप्रदाय गोंदिया जिल्हाध्यक्ष किशोर तरोणे करणार आहेत.नवेगावबांध येथुन दरवर्षी मोठ्या श्रद्धेने आणि भक्तिभावाने ही दिंडी निघत असते. यावर्षीही १९ जून रोजी आळंदीतून निघणाऱ्या संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात गोंदिया जिल्ह्यातील ही दिंडी सहभागी होणार आहे.

# माध्य.शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या माहिती अधिकार फलकावर बदलून गेलेल्यांची नावे

**गोंदिया**: माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार, प्रत्येक शासकीय कार्यालयात माहिती अधिकार फलक असणे आवश्यक आहे.ज्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नाव, पदनाम आणि संपर्क माहिती नमूद केलेली असते.जर फलकावरील नाव बदलले नसेल, तर लोकांना योग्य अधिकाऱ्याशी संपर्क साधण्यात अडचणी येऊ शकतात, ज्यामुळे माहिती मिळवण्यास विलंब होऊ शकतो.असे असतानाही गोंदिया जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमधील माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर लावलेला माहिती अधिकार अधिनियमाचा फलक बघितल्यास या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे किती लक्ष याकडे आहे,याचे चित्र बघावयास मिळते.

वास्तविक या कार्यालयाच्या भिंतीवर लावलेले फलकावरील नाव बघितल्यास येथील अधिकारी हे वर्षाआधीच बदलून गेलेले आहेत.प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे नाव असून त्यांची बदली होऊन वर्ष लोटलेला आहे.त्यासोबतच जनमाहिती अधिकारी म्हणून पी.पी.समरीत यांचे नाव फलकावर आहे,ते गोंदिया पंचायत समिती कार्यालयात बदलून गेले,तो कालावधीही वर्षाच्या जवळपास असताना याकेड कुणाचेच लक्ष कसे गेले नाही अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

कादर शेख यांच्या जागी महेंद्र गजभिये शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत राहीले,आता त्यांच्या बदलीनंतर सालेकसा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विशाल डोंगरे यांच्याकडे या कार्यालयाचा अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे.त्यासोबतच समरीत यांच्या जागी दिघोरे येथे कार्यरत असताना अद्यापही या फलकावर जुनेच नावे घालून विभाग नागरिकांची दिशाभूल करतोय हे स्पष्ट झाले आहे.सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून कार्यरत प्र.अधिक्षक नरेश भगत यांची बदली योजना शिक्षणाधिकारी कार्यालयात बदली झालेली आहे.

त्यामुळे हे पद सुध्दा रिक्त असून माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात अधिक्षक हे पदच रिक्त असल्याने माहिती अधिकार कायद्यातंर्गत लावलेल्या फलकावरील नाव नागरिकांची दिशाभूल करणारे ठरले आहे.शासकीय कार्यालयात माहिती अधिकार फलकावरील नाव बदलणे हे आवश्यक आहे. जर ते बदलले नसेल, तर ते कायद्याचे उल्लंघन आहे.

# जेईई ॲडव्हान्स परीक्षेत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी घेतली उंच भरारी



**गोंदिया** : जेईई ॲडव्हान्स २०२५ परीक्षेचा निकाल सोमवारी (दि.२) जाहीर झाला. या परीक्षेत जिल्ह्यातील ३० हून अधिक विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले असून, येथील सिद्धिविनायक एज्युकेशन इन्स्टिट्यूटचा मित त्रिवेदी याने २१३४ ही रैंक प्राप्त करून अव्वल स्थान प्राप्त केले आहे. मित हा मूळचा गोंदिया येथील असून, त्यांने जेईई मेन्स परीक्षेतसुद्धा अव्वल स्थान प्राप्त केले होते, तर २९ विद्यार्थीसुद्धा टॉप रैंकमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

देशातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी घेण्यात येणाऱ्या जेईई ॲडव्हान्स्ड २०२५ चा निकाल मंगळवारी जाहिर झाला आहे. यावर्षी ही परीक्षा आयआयटी कानपूरने आयोजित केली होती आणि उमेदवार त्यांचा निकाल क्षशशरर्वी.रल.ळप या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध करून जेईई ॲडव्हान्स परीक्षेत २१३४ रैंक प्राप्त करून गोंदिया व भंडारा जिल्ह्यात अव्वल ठरलेला मित त्रिवेदीला आता थेट आयआयटीला प्रवेश मिळणार आहे. मितने जेईई मेन्स परीक्षेतसुद्धा अव्वल स्थान प्राप्त केले होते. तो दररोज १५ ते १८ तास अभ्यास करीत होता. त्याने जेईई ॲडव्हान्स परीक्षेसाठी इन्स्टिट्यूमध्ये भरपूर सराव केला. त्याचे फलित झाले असून, त्याने या परीक्षेत उंच भरारी घेतली आहे. मितचे आई वडील हे दोघेही त्याला नेहमी प्रोत्साहन दिल्याचे मित याने सांगितले. दिला होता. यात गोंदिया येथील सिद्धिविनायक रज्युकेशन इन्स्टिट्यूटचा मित त्रिवेदी या विद्यार्थ्याने २१३४ ही रैंक प्राप्त करून गोंदिया-भंडारा जिल्ह्यात अव्वल स्थान प्राप्त केले आहे, तर करिअर झोन इन्स्टिट्यूच्या १८ विद्यार्थ्यांनी टॉप रैंक घेत यश प्राप्त केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आई-वडील व इन्स्टिट्यूच्या संचालकांनी कौतुक केले आहे.

# एसडीओ कार्यालयासमोरील सिमेंट रस्त्याचे निकृष्ट बांधकाम

**तिरोडा** – येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर नागरी सुविधा योजनेतंर्गत तयार होत असलेल्या सिमेंट रस्त्याचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे होत असतानाही प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधली आहे काय अशा जनता विचारु लागला आहे.सदर रस्त्याचे काम करतांना मुरुमावर पाणी घालून रोडरोलर न चालविताच त्यावरच गिट्टी घालून सिमेंट रस्ता तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले.



देशाचा विकास हा मोठ्या प्रमाणात रस्त्याचा विकास यावर अवलंबून असतो,नागरिकांना जाण्यायेण्यासाठी त्रास नको यासाठी शासनाने अनेक योजनेअंतर्गत रस्ते बनवित असते. परंतु, सरकार रस्ते बनविण्याकरिता ज्या कंत्राटदारांना कंत्राट देत असते ते कंत्राटदार नित्कृष्ट दर्जाचे रस्ते बनवित असल्याचे तिरोडा उपविभागीय कार्यालयासमोरील नागरी सुविधा योजने अंतर्गत बनत असलेला सिमेंट रोड नित्कृष्ट दर्जाचा बनत आहे.या रस्ता बांधकामाची माहिती नगरपरिषदेचे कनिष्ठ अभियंत्याना दिल्यावरही त्यांनी कुठलीही कारवाई न केल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

ज्या ठिकाणी रस्त्याचे काम सुरु आहे,तिथे मी स्वतः जाऊन पाहणी करुन सदर कंत्राटदारास चांगल्या दर्जाचे रस्ता बांधकाम करण्यासंबधी निर्देश देणार असल्याचे कनिष्ठ अभियंता अखिलेश सोनटक्के यांनी सांगितले.

# शासकीय जागेवर अतिक्रमण करणे ग्रामपंचायत सदस्याला भोवले




**तिरोडा** : शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्यावर व्यवसाय उभारल्याप्रकरणी तालुक्यातील मांडवी येथील ग्रामपंचायत सदस्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली. विमला बाळकृष्ण दमाहे असे अपात्रतेची कारवाई झालेल्या ग्रामपंचायत सदस्याचे नाव आहे.

तालुक्यातील मांडवी ग्रामपंचायतच्या सदस्या विमला बाळकृष्ण दमाहे यांना शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्यावर व्यवसाय उभारल्यामुळे त्यांचे सदस्यपदावरून अपात्र ठरविण्यात यावे अशी तक्रार करण्यात आली होती. तक्रारीनुसार ग्रामपंचायत निवडणुकीनंतर सदस्या विमला दमाहे यांनी तिरोडा-तुमसर महामार्गावरील बसस्थानकाजवळील शासकीय जागा गट क्र. ३२८ च्या जागेवर अतिक्रमण करून पानठेला, चहाटपरी उभारल्याचा आरोप केला होता. या ठिकाणी शासकीय विहीर, जिल्हा परिषद शाळा आणि इतर सार्वजनिक ठिकाण असल्याने गावकऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण होत होता. ग्रामपंचायत मांडवीने १५ जानेवारी २०२४ व १५ फेब्रुवारी २०२४ रोजी सदस्य दमाहे यांना अतिक्रमण हटविण्याबाबत नोटीस बजावली होती. पण त्यांनी त्याचे पालन केले नाही. तसेच तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनाही यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. यावरून तहसील कार्यालयातील तलाठी व ग्रामसेवक यांचा स्पष्ट अहवाल प्राप्त झाला. २७ डिसेंबर २०२४ च्या तलाठी अहवालात सदर जागा शासकीय असून सदस्या यांचे टपरी तेथे अस्तित्वात असल्याची नोंद आहे. ग्रामसेवकांनीही अतिक्रमण अधोरेखित केले आहे. तर विमला दमाहे यांनी आपले म्हणणे सादर करताना या टपरीतून त्यांचे पती गेल्या अनेक वर्षांपासून उपजीविका चालवली असल्याचे नमूद केले. मात्र, त्यांनी अतिक्रमणाचे पुरावे फेटाळण्यासाठी कोणतेही कागदपत्रे सादर केले नाही.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जवाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# डायरियाबाबत विविध उपक्रमांतून जनजागृती करा

**गोंदिया :** पावसाळ्यात दूषित पाणी पिऊन डायरीया, गॅस्ट्रो व कावीळ यासारखे अनेक आजार होतात. त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जंतुक करून पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना दूर ठेवता येते. यासाठी गावस्तरावर विविध उपक्रम घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात सोमवारी (दि.१६) आयोजित 'स्टॉप डायरिया' अभियान जिल्हास्तरीय कार्यदल सभेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. सभेला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एम.म रूगानंथम, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंद वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) फरेंद्र कुतीरकर, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विजय आखाडे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल, जिल्हा आय.ई.सी. अधिकारी प्रशांत खरात यांच्यासह जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. गोल्हार यांनी या मोहिमेच्या माध्यमातून संस्था स्तरावर ओआरएस कॉर्नरची स्थापना करण्यासह जल शुष्कतेने बाधित रुग्णांचे उपचार केले जाणार आहेत. तसेच अतिसाराबाबत कोणतीही लक्षणे आढळल्यास नागरिकांनी घाबरू नये तसेच लगेच नजीकच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केले.

**३१ जुलैपर्यंत राबविणार 'स्टॉप डायरिया' अभियान**

जिल्हा परिषद आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, पंचायत विभाग आदींच्या संयुक्त विद्यमाने मस्टॉप डायरियाफ हे अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट शून्य ते पाच वयोगटातील बालकांमध्ये अतिसाराच्या प्रादुर्भावास प्रतिबंध घालणे आणि योग्य उपचार पोहोचवणे आहे. या मोहिमेंतर्गत अतिसार बाधित बालकांना ओआरएसचे पाकीट आणि झिंकच्या गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. त्याचबरोबर अंगणवाडी केंद्र, शाळा आणि आरोग्य केंद्रामध्ये ओआरएस घोळ तयार करण्याचे आणि स्वच्छतेसंबंधी हात धुण्याचे प्रात्यक्षिके दाखविण्यात येणार आहेत.

# नीट परीक्षेत भजेपारच्या विशाखा रहांगडालेची बाजी

**गोंदिया :** राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) शनिवारी (दि.१४) नीट यूजी २०२५ चा निकाल जाहीर केला. यात गोंदिया जिल्ह्यातील ३५ वर विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यात आमगाव तालुक्यातील भजेपार येथील विशाखा रहांगडाले या विद्यार्थिनीने ३००२ रैंकिंग प्राप्त करीत बाजी मारली.



नीट परीक्षेत ऑल इंडिया ३००२ रैंकिंग घेऊन उत्तीर्ण होणारी विशाखा रहांगडाले ही आमगाव तालुक्यातील भजेपार या गावातील विद्यार्थिनी आहे. हे गाव ग्रामीण क्षेत्रात आहे. विशेष म्हणजे विशाखाचे वडील हे टेलर तर आई गृहिणी आहे. विशाखाने शिकवणी वर्गात दररोज १० ते १२ तास अभ्यास आणि परीक्षेचा सराव करून हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशाचे कौतुक केले जात आहे.

वैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी महत्त्वपूर्ण असणारी नीट यूजी परीक्षेचा निकाल शनिवारी दुपारी जाहीर झाला. देशभरातील आणि परदेशातील केंद्रांवर ही परीक्षा ४ मे २०२५ रोजी घेण्यात आली. ज्यात २२ लाखांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. आता प्रवेश प्रक्रिया संबंधित प्राधिकरणांमार्फत पार पडेल. गोंदिया जिल्ह्यातील विविध खासगी शिकवणी वर्गाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. यात स्थानिक सिद्धिविनायक एज्युकेशन इन्स्टिट्यूटची विद्यार्थिनी विशाखा रहांगडाले या विद्यार्थिनीने ऑल इंडिया ३००२ रैंकिंग प्राप्त केले आहे. यासह जिल्ह्यातील २३ विद्यार्थीसुद्धा चांगल्या रॅंकिंगने उत्तीर्ण झाले असून त्यांना चांगल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# १३७०२ विद्यार्थी २३ जून रोजी ठेवणार शाळेत पहिले पाऊल



**गोंदिया :** उन्हाळ्याच्या सुट्यांनंतर विदर्भासह अन्य जिल्ह्यातील मराठी माध्यमांच्या शाळा येणाऱ्या २३ जून रोजी उघडणार आहेत. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या स्वागतासह विविध उपक्रमांसाठी जय्यत तयारी सुरु आहे. नविन शैक्षणिक सत्राच्या पहिल्या दिवसासाठी विद्याथ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येत आहे. आणि शाळेच्या पहिल्याच दिवशी १३ हजार ७०२ मुल शाळेत आपले पहिले पाऊल ठेवणार आहे.

प्रथमच यंदा जिल्हा परिषदेचे अधिकारी प्रमुख शाळांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. २२ जून नंतर शाळांच्या सुट्या संपणार आहेत. व त्यानंतर २३ जून रोजी नविन शैक्षणिक सत्र सुरु होणार आहे. व शाळेची पहिली घंटा वाजणार आहे. शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या स्वागताचा असतो. म्हणून शाळेत आपले पहिले पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्यांच्या स्वागतासाठी विशेष उपक्रम लागू करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा शिक्षण विभाग सज्ज झाला असून शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याच्या योजना बनविण्यात आल्या आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत प्रथमच पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्यांच्या स्वागताची तयारी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या रॅलीसह शहरातील अनेक शाळांममध्ये नविन उपक्रम राबविले असून चिमुकल्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे.

जिल्ह्यातील १ हजार ६४२ शाळातील २ लाख २७ हजार ९१३ विद्यार्थी २३ जून रोजी शाळेत प्रवेश करणार आहेत. एवढेच नव्हेतर जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य

कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी पंचायत, शिक्षण सभापती सुरेश हर्षे, प्रकल्प संचालक, कार्यकारी अभियंता मुख्य लेखाधिकारी जनार्दन खोटरे, शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी, माध्यमिक शिक्षण अधिकारी डोंगरे, उप शिक्षणाधिकारी, गटशिक्षाधिकारी कार्यालय प्रमुख अधिकारी, शिक्षण विभागाचे सर्व अधिकारी, बीडीओ, आरोग्य विभाग व अन्य अधिकारी शाळांचा दौरा करणार आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरगानंथम यांनी असे आदेश जारी करून जिल्हा परिषद व पंचायत समितीचे प्रमुख अधिकाऱ्यांना दोन शाळांचा दौरा करून २५ जून पर्यंत या संदर्भात विभागीय कार्यालयात अहवाल सोपविण्याचे आदेश दिले.



## मोहाडी येथे अंगणवाडी नवीन इमारत बांधकामाचे भूमिपूजन

**गोरेगाव–** तालुक्यातील ग्रामपंचायत मोहाडी येथे अंगणवाडीच्या नवीन इमारत बांधकामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती डॉ.लक्ष्मण भगत यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी गोरे–गाव पंचायत समितीचे उपसभापती रामेश्वर महारवाडे,सरपंच नरेंद्र चौरगडे,उपसरपंच मोहन पटले,माजी सरपंच रजनीताई धपाडे,नुतनलाल बिसेन,शाळेचे मुख्याध्यापक श्री बिसेन,विक्की धपाडे,वाकले,बघेल,संजय गलपल्लीवार व इतर ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, महिला आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिरोड्यात मोती(पर्ल) पिकांची शेती

## ऐवर ग्रीन सोशल असोसिएशन ला मिळाले यश

**चित्रा कापसे/तिरोडा –** गोंदिया तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. मासेमारीसह जलाशय शेतीच्या सिंचनासाठी देखील उपयुक्त आहेत. या जलाशयांचा मोती उत्पादनासाठी देखील वापर होवू शकतो, हे ओळखून एव्हरग्रीन सोशल असोसिएशन तिरोडा या संस्थेने गोड्या पाण्यातून पर्ल शेतीला सुरवात केली.त्यास चांगलेच यश आले असून पहिल्या मोत्यांच्या पीकातून गणेशाची प्रतिकृती साकारण्यात आल्याने आनंद व्यक्त केला जात आहे.

नागपूर येथे झालेल्या २०२४ या वर्षी अ?डव्हांटेज विदर्भ प्रदर्शनात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापर्यंत या संकल्पनेची माहिती पोहोचवण्यात आली. या शेतीमुळे रोजगाराची संधी वाढणार असून, पाण्याचे शुद्धीकरण, पर्यावरणाचे संतुलन, हस्तकलेचे उत्पादन आणि निर्यातक्षम उद्योग यामध्येही मोठी भर पडणार आहे.ङ्गशिंपल्यातून मोती मिळतो, पण प्रयत्नातून यश मिळतेङ्ग या उक्तीला खरं करत तिरोडा येथील एव्हरग्रीन सोशल असोसिएशनने मोती शेतीच्या क्षेत्रात अभूतपूर्व यश संपादन केलं आहे. विशेष म्हणजे या संघटनेने तयार केलेला पहिला मोती गणेशाच्या आकृतीचा असून, तो शुद्ध गोड्या पाण्यात तयार करण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्यातील हा पहिला आणि ऐतिहासिक मोत्याचा पीक असल्याने या उपक्रमाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून आहे.मोठ्या प्रमाणावर गोड्या पाण्याचे तलाव, विहिरी आणि जलसाठे उपलब्ध आहेत. या नैसर्गिक संपत्तीचा सकारात्मक उपयोग करत एव्हरग्रीन सोशल असोसिएशनचे संस्थापक सुबोध बैस व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेल्या सहा वर्षांपासून संशोधनात्मक काम सुरू



केले. सुरुवातीला अनेक अडचणी, आर्थिक चणचण, पाण्याचे नियोजन, योग्य शिंपले निवडणे यांसारख्या समस्या आल्या. मात्र या सर्व अडथळ्यांवर मात करत त्यांनी सीता संस्थेकडून घेतलेले प्रशिक्षणाचा आधारावर अभ्यास आणि प्रत्यक्ष तलावातील प्रात्यक्षिक यांचा समन्वय साधत २०२५ मध्ये पहिले पीक घेण्यात यश मिळवले.

# गोरेगाव न. पं.त राजकीय हालचालींना वेग




**गोरेगाव:** नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांसाठी वॉर्ड पुनर्रचना प्रक्रियेची सुरुवात करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यामुळे येत्या दोन ते तीन महिन्यांत निवडणुका होण्याची शक्यता आहे. ही राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि इतर पक्षांत राजकीय हालचालींना वेग आला आहे.

गोरेगाव नगरपंचायतीत सध्या प्रशासकीय राजवट लागू आहे. त्यामुळे विकासकामांवर परिणाम झाला असून नागरिकांचे लक्ष आता निवडणूक प्रक्रियेवर केंद्रित झाले आहे. गोरेगावला गेल्या दहा वर्षापासून नगरपंचायतीचा दर्जा मिळालेला असला तरी आजपर्यंत फक्त एकदाच निवडणूक झाली आहे. ही निवडणूक २०१५ साली झाली होती आणि त्याचा कार्यकाल २०२० पर्यंत होता. २०१७ मध्ये गोरेगाव नगरपंचायतीमध्ये काँग्रेस आणि अपक्ष सदस्यांनी एकत्र येऊन सत्तास्थापना केली होती. नंतर अडीच वर्षांनी भाजप आणि अपक्षांनी सत्ता काबीज केली. २०१५ च्या निवडणुकीत काँग्रेसने अपक्ष नगरसेवकांसह सरकार स्थापन केले होते. सीमा राहुल कटरे या गोरेगाव नगरपंचायतीच्या पहिल्या नगराध्यक्ष झाल्या. त्यानंतर अडीच वर्षांनी अपक्षांनी भाजपसोबत युती केली आणि अपक्ष उमेदवार आशिष बारेवार नगराध्यक्ष झाले. दोन्ही वेळा अपक्ष उमेदवारांची निर्णायक भूमिका राहिली आहे.

**नगरपंचायत निवडणुकीच्या उमेदवारांची कसोटी सुरू**

सालेकसा नगरपंचायत निवडणुकीचे नगाडे वाजू लागले असून । सप्टेंबरपर्यंत वॉर्ड रचना पूर्ण झाल्यानंतर ऑक्टोबर महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता आहे. येथे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित आहे. त्यामुळे भाजप, काँग्रेस आणि इतर पक्ष या पदासाठी योग्य उमेदवारांच्या शोधात आहेत. दीड वर्षांपूर्वी झालेल्या आरक्षण सोडतीत सालेकसा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित झाले होते. त्यानंतर भाजप आणि काँग्रेसच्या अनेक इच्छुकांनी नगराध्यक्ष पदासाठी इच्छुकता दर्शवून वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधले आहेत. सध्या दोन्ही पक्षांचे नेते सक्षम आणि लोकप्रिय उमेदवार शोधण्याच्या प्रयत्नात आहेत. भाजप आणि काँग्रेसबाबत बोलायचे झाल्यास, काँग्रेसमध्ये काही मोजकेच लोक नगराध्यक्ष पदासाठी रिंगणात आहेत आणि तयारीस लागले आहेत. मात्र भाजपमध्ये उमेदवारीबाबत अजूनही संभ्रमाची स्थिती आहे, काँग्रेसच्या उमेदवारांना सामोरे जाण्यासाठी योग्य उमेदवाराचा शोध भाजपकडून सुरू आहे. भाजपमध्ये काँग्रेसपेक्षा अधिक इच्छुक असल्यामुळे सध्या कोण प्रबळ उमेदवार आहे हे निश्चितपणे सांगता येत नाही

## निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता

**या निवडणुकीत अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस– अजित पवार गट भाजपसोबत जाण्याची शक्यता आहे, तर काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवेल. गोरेगावमध्ये शरद पवार गट फारसा प्रभावी नाही. जर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) भाजपसोबत युती करत असेल, तर भाजपसाठी ही निवडणूक तुलनेने सोपी होऊ शकते. मात्र सध्याच्या घडीला निश्चितपणे काहीही सांगता येत नाही. गोरेगाव नगरपंचायतीमध्ये काँग्रेसने अडीच वर्षे आणि भाजपने अडीच वर्षे सत्ता उपभोगली आहे. त्यामुळे आगामी निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे.**



# इंटरसिटी एक्स्प्रेसचा थांबा सालेकसा येथे देण्यात यावे

**सालेकसा –** :रेल्वे मंत्रालयाने नुकतीच जाहीर केलेली जबलपूर रायपूर इंटरसिटी एक्सप्रेससह इतवारी बिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेस रेल्वेगाडीचा थांबा सालेकसा रेल्वेस्थानकात देण्यात यावे या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस सालेकसा तालुक्याच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार प्रफुल पटेल यांना देण्यात आले.

निवेदनात सालेकसा रेल्वे स्थानकावर ट्रेन क्रमांक १२८५५/१२८५६ इतवारी बिलासपूर इंटरसिटी एक्स्प्रेस व नवीन घोषणा करण्यात आलेली जबलपूर रायपूर इंटरसिटी एक्सप्रेसचा थांबा देण्यात यावे याकरिता राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे तालुका अध्यक्ष डॉ अजय उमाटे, शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस, युवक तालुका अध्यक्ष बाजीराव तरोने, संतोष नागपुरे, संदीप मिश्रा यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.आले यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन,आमदार इंजि.राजकुमार बडोले उपस्थित होते.खासदार पटेल यांनी शिष्टमंडळाला दोन्ही गाड्यांचे थांबे सालेकसा रेल्वेस्थानकावर मिळावे याकरीता रेल्वेमंत्र्यांशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले.

## धानाची बीजप्रक्रिया करुन पेरणी करण्याकरीता शेतकरी बांधवांसाठी कृषि संदेश

**गोंदिया** :कृषि उत्पादनात पीक संरक्षणास जेवढे महत्व आहे तेवढेच महत्व बीजप्रक्रियेस आहे. परंतु बियाणे प्रक्रियेस जेवढे महत्व पीक संरक्षणामध्ये घ्याववयास पाहिजे तेवढे दिले जात नाही. निरनिराळ्या औषधाच्या फवारण्यामुळे उभ्या पिकावरील किडी व रोगांचे नियंत्रण होते. तर बीज प्रक्रियेमुळे बियाणावरील सुप्तावस्थेत असलेल्या किडीची व रोगांचे तसेच इतर जिव–णूचे नियंत्रण सुरुवातीस होते. म्हणून पेरणीपूर्वी बियाणास बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन देवरी उपविभागीय कृषि अधिकारी रुपेश मेश्राम यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी क्षेत्रीय पातळीवर काम करणारे कृषि सहायक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# नीटच्या परिक्षेत साक्षी रहांगडाले अव्वल

**तिरोडा :** राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) १४ जून रोजी नीट यूजी २०२५ चा निकाल जाहीर करण्यात आला. या निकालात तिरोडा तालुक्यातील खमारी येथील कु. साक्षी पारेंद्रकुमार रहांगडाले या विद्यार्थिनीने १००० रॅंकिंग प्राप्त करीत यश संपादन केले आहे. या कामगिरीमुळे ती जिल्ह्यातून प्रथम ठरली आहे.



वैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी महत्त्वपूर्ण असणारी नीट यूजी परीक्षेचा निकाल शनिवारी दुपारी जाहीर झाला. जिल्ह्यातून जवळपास ३५च्यावर विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले. निकालात खमारी येथील पारेंद्रकुमार रहांगडाले व सौ. ठानेश्वरी रहांगडाले यांची सुकन्या कु. साक्षी पारेंद्रकुमार राहांगडाले हिने नीट परीक्षेत ७२० पैकी ६०० गुण घेऊन ऑल इंडिया रॅंकिंगमध्ये १००० रैंक प्राप्त करीत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. साक्षीच्या यशाबद्दल तिचे अभिनंदन केले जात आहे.

# भाजपाचा ग्राफ चढता, आता स्थानिक आमदार आपला मग महायुती कशाला !

**गोंदिया :** स्थानिक नगर परिषदेत गेल्या निवडणुकीत भाजपने बहुमत प्राप्त करीत सत्ता स्थापन केली होती. तर सन २०११ च्या निवडणुकीतसुद्धा भाजपाचे १६ नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे गोंदिया नगर परिषदमध्ये भाजपाचा ग्राफ चढता असून आता स्थानिक आमदारदेखील भाजपाचे आहे. त्यामुळे भाजपावी ताकद वाढली असून नगर परिषद निवडणुकीत महायुती नको तर स्वबळावर लढू अशा भावना भाजपाच्या पदाधिकारी

आणि कार्यकर्त्यांनी आपल्या वरिष्ठ नेत्यांकडे व्यक्त केल्याची माहिती आहे.




नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग रचनेच्या प्रक्रियेला ११ जूनपासून सुरुवात झाली आहे. ही प्रक्रिया १ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. प्रभाग रचनेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये नगर परिषद व नगरपंचायतच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात गोदिया, तिरोडा नगर परिषद आणि सालेकसा, गोरेगाव नगरपंचायतीची निवडणूक होणार आहे. त्यासाठी आता हालचालीना वेग आला

आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका महायुती आणि महाविकास आघाडी करून लढण्यात आल्या. त्यामुळे हाच फार्म्युला या निवडणुकांमध्ये कायम राहणार का याबाबत शंका आहे. गोदिया नगर परिषदेचा सन २०११ आणि २०१७च्या निवडणुकीचा मागोवा घेता या निवडणुकीत भाजपा अधिक उमेदवार निवडून आणत सत्ता स्थापन केली होती. या नगर परिषदेत सध्या २१ प्रभाग असून एकूण ४२ नगरसेवक आहेत. तर प्रभागरचनेत एक प्रभाग वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. प्रभाग वाढल्यास नगरसेवकांची संख्या वाढेल हे निश्चित आहे. तब्बल ४५ वर्षांनतर गोंदिया विधानसभा क्षेत्रातून भाजपाचा आमदार निवडून आला. स्थानिक आमदार असल्याने भाजपाची ताकद वाढली असून ही निवडणूक त्यांच्यासाठीसुद्धा प्रतिष्ठेची आहे.

त्यामुळेच भाजपाचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते या निवडणुकीत महायुती नको तर स्वतंत्र लढू असा संदेश वरिष्ठांना देत आहे. त्यामुळे यावर पक्ष काय निर्णय घेते हे लवकरच कळेल. त्यामुळे महायुतीतील मित्र पक्षांनीसुद्धा स्वबळाची भूमिका घेत कामाला सुरुवात

# पाच नवीन एसटी बसेसचे लोकार्पण

**तिरोडा–** तालुक्यातील प्रवाशांना आपल्या गंतव्यस्थानी पोचण्याकरीता चांगल्या सुविधा हव्यात तसेच एसटीचा सुविधाजनक प्रवास करता यावा, यासाठी तिरोडा आगाराला १० बस देण्यात यावे, अशी मागणी मागील अनेक दिवसांपासून मागणी केली जात होती. दरम्यान मागणीची दखल घेत आमदार विजय रहांगडाले यांनी मुख्यमंत्री व परिवहन विभागाचे मंत्री प्रतापराव सरनाईक तसेच महाव्यवस्थापक परिवहन विभागाकडे पाठपुरावा करून १० बससेची मागणी केली. दरम्यान आ. रहांगडाले यांच्या प्रयत्नाने तिरोडा आगाला ए–६ च्या ५ बस मिळाल्या. दरम्यान आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते सदर बसेसचे लोकर्पण करण्यात आले.



तिरोडा आगारातील बऱ्याच बसेस जुन्या असल्याने बस रस्त्यात बंद पडत असते. बसस्थानकावर सकाळपासून रात्रीपर्यंत मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी दिसून येते. एवढेच नव्हे तर प्रत्येक बस प्रवाशांची खच्चून भरून धावत असल्याचेही दिसून येते. प्रवाशी जास्त आणि बसेस कमी असल्याने अनेकदा कोणत्या मार्गावर बसेस पाठवायची आणि कोणत्या मार्गावर प्रवाशांना मथांबाफ्चा संदेश द्यायचा, असा प्रश्न अधिकाऱ्यांना पडतो. त्यातच आता नवीन शैक्षणिक सत्र सुरू होणार असल्याने प्रवास्यांसह विद्यार्थ्यांचीही गर्दी बस स्थानकावर दिसून येणार आहे. या परिस्थितीत तिरोडा आगाला नवीन १० बसेस उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी केली जात होती. आमदार रहांगडाले यांनी मुख्यमंत्री, परिवहन विभागाचे मंत्री प्रतापराव सरनाईक आणि महाव्यवस्थापक परिवहन विभाग यांना राज्य परिवहन वाहन विभाग यांना तिरोडा आगारला दहा बस मिळण्याची २८ मार्च २०२५ ला पत्र देऊन मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून तिरोडा आगाराला पाच नविन बसेस प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी, महिला, व्यापारी व सर्व प्रवाशांना प्रवाश्यांना चांगली सेवा मिळू शकेल., असे मत आमदार रहांगडाले आभार व्यक्त केले. त्यातच नवीन मिळालेल्या बसांचा आ. रहांगडाले यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रादेशिक अभियंता नागपूर व अमरावती प्रदेश महेंद्र कुमार नेवारे, विभाग नियंत्रक श्रीमती काळमेघ, यंत्र अभियंता खवळे उपस्थित होते.

# शिबिरात ७ हजार नागरिकांना मिळाला योजनांचा लाभ





**गोंदिया :** छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत ९ ते ११ जून दरम्यान ग्रीनलँड लॉन, रिंग रोड येथे तीन दिवसीय भव्य जन सेवा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ७हजाराहून अधिक नागरिकांनी सहभाग घेत केंद्र व राज्य शासनाच्या २५ पेक्षा अधिक योजनांचा थेट लाभ घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानाची अंमलबजावणी केली जात आहे. यातंर्गत गोंदिया येथील ग्रीनलैंड लॉन येथे विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना मिळावा, त्यांचा वेळ व पैशाची बचत व्हावी, दाखल्यांसाठी होणारी पायपीट थांबावी, यासाठी आ. विनोद अग्रवाल यांच्या पुढाकाराने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात लाभार्थ्यांना एकाच छताखाली विविध योजनांचा लाभ देवून दाखल व प्रमाणपत्र देण्यात आले. या शिबिराला जिल्हाधिकारी प्रजीत नायर, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत,तहसिलदार समशेर पठाण,अप्पर तहसिलदार श्रीकांत कांबळे,पंचायत समिती सभापती मुनेश रहागंडाले व इतर महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते, त्यांनी शिबिराचं निरीक्षण केले.

विशेष म्हणजे, शिबिराच्या माध्यमातून योजनांची त्वरित अंमलबजावणी करण्यात आली. शिबिरात कुठलीही अडचण होवू नये, याकरीता सर्व व्यवस्था करण्यात आली होती. योजनांचे फॉर्म भरताना लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची मोफत झेरॉक्स सुविधा, प्राथमिक उपचारासाठी वैद्यकीय पथक, नागरिकांसाठी वातानुकूलित व्यवस्था, कर्मचारी व सगणक ऑपरेटरसाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. सेतु केंद्राच्या ऑनलाइन प्रक्रियेसाठी लागणारा सर्व शुल्कासाठी आ. विनोद अग्रवाल यांनी पुढाकार घेतला होता. त्याचप्रमाणे शिबिरात सहभागी नागरिकांसाठी थंड पाणी व अत्योहारची व्यवस्था देखील करण्यात आली होती.

**शिबिरात मिळाला या योजनांचा लाभ**

आयोजित भव्य शिबिरात नागरिकाना विविध योजनांचा लाभ देण्यात आला. यामध्ये संजय गांधी व श्रावण बाळ योजना – १०६८, राष्ट्रीय कुटुंब सहायता योजना ४५, राशन कार्ड वाढीव इष्टांक पीएचएच– २५००, सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना २०८, सलोखा योजना–५, लक्ष्मी मुक्ती योजना – ३. जात प्रमाणपत्र –५३, उत्पन्न दाखले–८३७, वाटणीपत्र–१०२, सातबारा वाटप ३०६, राशन कार्ड दुरुस्ती–७७७. प्रधानमंत्री किसान सन्मान निथी–४१, कलम १५५ बाबत दुरुस्ती– २२१, इतर दाखले १६३, शेतकरी अपघात सुरक्षा योजना, सूक्ष्म सिंचन, कृषी यांत्रिकीकरण, फळबाग लागवड, इनकम सर्टिफिकेट ९४९, रहिवासी प्रमाणपत्र – ३. वय व नागरिकता प्रमाणपत्र ६६०, सीनियर सिटीझन १०, अल्पभूधारक १, एनसीएल– ३५९, जाती प्रमाणपत्र – २०, ईडब्ल्यूएस राज्य ४३ ईडब्ल्यूएस केंद्र २५, प्रूफ ऑफ इनकम ६२९, ३० टक्के महिला आरक्षण–७. डोमिसाईल इत्यादी विविध योजनांचा थेट लाभ जागेवरच देण्यात आला.

## बोनससाठी आला निधी,दीड लाख शेतकऱ्यांना दिलासा



गोंदिया : शासकीय धान खरेदी केंद्रांवर धानाची विक्री करणाऱ्या नोंदणीकृत शेतकऱ्यांना शासनाने बोनस जाहीर केला होता. या बोनसची रक्कम तब्बल सहा महिन्यांनंतर शनिवारी (दि. १४) प्राप्त झाली असून, बोनसची रक्कम बुधवारपासून १,५६,४३२ धान विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी करणाऱ्यां शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली जाणार असल्याची माहिती आहे. बोनससाठी निधी प्राप्त झाल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहान अनुदान म्हणून शासनाकडून बोनस जाहीर केला जातो. गेल्या वर्षी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात महायुती सरकारने धानाला प्रतिहेक्टर २० हजार रुपये बोनस दोन हेक्टरपर्यंत जाहीर केला होता. पण यासंदर्भातील आदेश निघण्यासाठी तीन महिने लागले होते. तर त्यानंतर बोनससाठी निधी उपलब्ध होण्यास तीन महिने लागले. गेल्या तीन महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या नजरा बोनसची रक्कम कधी खात्यावर जमा होते, याकडे लागले होते.

आठ दिवसांपूर्वी खा. प्रफुल्ल पटेल यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह बैठक घेऊन बोनससाठी त्वरित निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ९०० कोटी रुपयांचा निधी मार्केटिंग फेडरेशनला लगेच उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली होती. यानंतर शासनाने शनिवारी मार्केटिंग फेडरेशनला बोनससाठी निधी उपलब्ध करून दिला असून, यासंबंधीचे पत्र जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला दिले आहे. गोंदिया जिल्ह्यातील १ लाख ५६ हजार शेतकरी बोनससाठी पात्र ठरले असून, त्यासाठी १८० कोटी ६३ लाख ५६ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. बुधवारपासून (दि. १८) शेतकऱ्यांच्या खात्यावर बोनसची रक्कम वळती करण्यास सुरुवात केली जाणार असल्याचे जिल्हा मार्केटिंग फेडरेशन अधिकारी विवेक इंगळे यांनी सांगितले.

## नगर पंचायतमध्ये आकृतीबंधप्रमाणे पद भरती करा



**सालेकसा:** नगर पंचायत येथे शासन निर्णयानुसार नियमाप्रमाणे ठरवलेला आकृतीबंध प्रमाणे पद भरती करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने करण्यात आली आहे. या संदर्भात विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन नागपूर यांना तहसीलदार नरसय्या कोंडागुरले यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.

सालेकसा नगर पंचायत स्थापनेच्या वेळी नगर पंचायतची लोकसंख्या ३६९० एवढी होता. त्याप्रमाणे एकूण १८ पदसंख्या निश्चित करण्यात आली होती. आणि त्या नंतर आमगाव खुर्द ही मोठी ग्रामपंचायत सालेकसा नगर पंचायत मध्ये समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे लोकसंख्या ८८८७

इतकी झाली आहे. सदर लोकसंख्या बघता नागरिकांना योग्य सोई सुविधा मिळावे म्हणून शासनाने आकृतीबंध तयार करून कर्मचारी भरतीचा निर्णय घेतला आहे. परंतु, अद्यापही आकृतीबंध प्रमाणे पद भरती झालेली नाही. यामुळे विकासकामांवर परिणाम होवून नागरिकांना विविध सेवांपासून वंचित रहावे लागत आहे. शिवाय अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे कामे प्रभावित होत आहे. याची दखल घेवून आकृतीबंध प्रमाणे पद भरती करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन तहसीलदार नरसय्या कोंडागुरले यांच्या मार्फत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन नागपूर यांना देण्यात आले. निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे, शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस, डॉ. हिरालाल साठवणे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष बाजीराव तरोने, महिला तालुका अध्यक्ष गीता चौधरी, दुर्गा पटले, योगराज पटले, किसनलाल रहांगडाले, जितेंद्र बडोल, बबलू मानकर, अरुण तावाडे, सोनू दसरिया उपस्थित होते.

## २.०९ लाख रुपयांच्या पशुखाद्याचा अपहार

**गोंदिया :** देवरी येथील औद्योगिक क्षेत्रातील सुफलाम इंडस्ट्रीज लिमिटेड या पशुखाद्य उत्पादक कंपनीतून २.०९ लाख रुपये किमतीचा पशुखाद्य माल ट्रकद्वारे बारामती येथे पाठविण्यात आला होता. मात्र, या मालातील एक भाग खराब झाल्यानंतर ट्रकचालकाने तो माल कंपनीकडे परत न करता अपहार केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी देवरी पोलिसांनी दोन जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. मेसर्स सुफलाम इंडस्ट्रीज लि. या कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी करण सतीश पांडे (२७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार २२ मे २०२५ रोजी सायंकाळी ६:०७ वाजल्यापासून ते १२ जून २०२५ रोजी सकाळी १०:००वाजतापर्यंत कालावधी दरम्यान त्यांनी बारामती ॲग्रो लिमिटेड या कंपनीकडून ३५ हजार ८९० किलो प्राणी खाद्यपूरक मालाची ऑर्डर मिळिवली. त्यानंतर माल पोहोचविण्यासाठी आरोपी प्रितम रोडवेज (मालक पी. आर. लिल्हारे) या ट्रान्सपोर्ट कंपनीशी संपर्क साधला. या कंपनीने आरोपी हजरत हसीब खान (रा. नरहरी पट्टी, विश्वाथगंज, जि. प्रतापगढ, उत्तर प्रदेश) या चालकाकडे ट्रक क्रमांक यूटी ७२–सीटी ०९२६ पाठवला. माल २७ मे २०२५ रोजी बारामती येथे पोहोचविण्यात आला, मात्र बारामती ॲग्रो कंपनीने तिथे तपासणी केल्यावर १० हजार ६३० किलो माल पावसामुळे खराब झाल्याचे निर्दर्शनास आले.

## आईच्या प्रेरणेतून सुरू केले रक्तसेवेचं मिशन!



**गोंदिया :** आईच्या आजारपणात रक्त मिळिवण्यासाठी करावी लागलेली धडपड, त्यासाठी आलेल्या अडचणी व रक्त मिळिवण्यासाठी होणारी रुग्णांच्या नातेवाइकांची तारांबळ या सर्व गोष्टींच्या अनुभवातून गोंदिया येथील एका तरुणांना रक्तसेवेचे मिशन सुरू केले आहे. रक्तासाठी रुग्णांच्या नातेवाइकांचा फोन येताच संबंधित गटाचा रक्तदाता शोधून वेळीच रक्त उपलब्ध करून देण्याचे काम गेल्या १३ वर्षांपासून ते करीत आहे. आईच्या प्रेरणेतून रक्तसेवेचे हे मिशन अजूनही अतरितपणे सुरू आहे.

विनोद चांदवानी असे रक्तसेवेचे मिशन चालविणाऱ्या युवकाचे नाव आहे. मुळात त्यांना ही रक्तसेवेची प्रेरणा त्यांची आई पुष्पादेवी चांदवानी यांच्यापासून मिळाली. त्यांची आई आजारी असताना त्यांना ए निगेटिव्ह रक्ताची गरज होती. पण, त्यांना या गटाचा रक्तदाता मिळाला नव्हता. त्यामुळे त्यांची खूप अडचण झाली होती. यासाठी त्यांना आणि

त्यांच्या कुटुंबीयांना अनेक ठिकाणी धावपळ करावी लागली होती. हीच बाब त्यांनी गांभीर्याने घेत तेव्हाच गरजू रक्तदात्यांसाठी काही तरी करण्याचा संकल्प केला. त्यांच्या युवा मित्र परिवारातील सदस्यांचा रक्त मित्र हा ग्रुप तयार केला.

या ग्रुपच्या रक्तदात्यांचे रक्तगट एका रजिस्टरमध्ये नोंदणी करून घेतले. हळूहळू यात जवळपास दोन हजार युवा मित्रांच्या रक्त गटाची नोंदणी करून घेतली. यानंतर त्यांनी शासकीय रुग्णालय व शहरातील प्रमुख रुग्णालयात त्यांनी आपला संपर्क क्रमांक दिला. एखाद्या रुग्णाला रक्ताची गरज आहे. या गटाचे रक्त हवे असा फोन विनोद चांदवानी यांना येताच ते त्यांच्याकडे असलेल्या रक्त मित्रांच्या यादीतून संबंधित रक्त गटाच्या रक्तदात्याशी संपर्क साधून वेळीच रक्तदान करण्यासाठी पाठवितात. यामुळे बरेचदा रुग्णाचे प्राण वाचविणे शक्य झाले आहे.

### ५ हजारांवर रुग्णांना मदत

गोंदिया येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व बाई गंगाबाई महिला रुग्णालय आहे. या ठिकाणी लगतच्या मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यातील रुग्णसुद्धा उपचार घेण्यासाठी येतात. त्यांना बरेचदा रक्ताची गरज असते. तेव्हा रक्त मित्रांच्या माध्यमातून विनोद चांदवानी हे त्यांना रक्त उपलब्ध करून देतात. गेल्या तेरा वर्षात त्यांनी या माध्यमातून ५ हजार रुग्णांना रक्त मिळवून देऊन जीवनदान देण्याचे काम केले आहे.

## संगणक चालक महिलेला मानसिक त्रास:आदेशाकडे पाथरी ग्रा.पं.चे दुर्लक्ष




**सालेकसा –** तालुक्यातील ग्रामपंचायत पाथरी येथील महिला संगणक चालक महिला कर्मचारीला ग्रामपंचायत सदस्यांच्या द्वेषापोटी मासिक सभेत ठराव घेत परिचालक पदावरुन कमी केल्याची तक्रार बालिका सुखलाल मच्छिरके यांनी केली आहे.महिला संगणक परिचालक म्हणून २०११ पासून पाथरी ग्रामपंचायत येथे कार्यरत असल्याचे तक्रारीत उल्लेख करीत वरिष्ठांकडे न्याय मागितले होते.वरिष्ठांनी देखील हा प्रकार योग्य नसल्याचे आदेश दिले. मात्र त्या आदेशांचेही पालन न करता वर्षभरापासून संगणक परिचालक महिलेला त्रास देण्याचे काम सुरू असल्याचे मच्छिरके यांचे म्हणने आहे.

पाथरी ग्रामपंचायत मध्ये कार्यरत संगणक परिचालकाला मासिक सभा किंवा ग्रामसभाच्या माध्यामातून थेट कामावरून कमी करता येत नाही, तसेच द्वितीय सुनावणीचा अंतिम निर्णय येईपर्यंत केंद्रचालकाला, संगणक परिचालक यांना कार्यालय ग्राम पंचायत पाथरी येथील कामावरुन कमी करण्यात येऊ नये, असे स्पष्ट नोंद असतांनाही यापूर्वी कोणतेही कारणे दाखवा नोटीस न बजावता ९ ऑक्टोबर २०२४ च्या मासिक सभेत खुलासा सादर करण्याचे पत्र न देता मासिक सभेनंतर चौथ्या दिवशी देण्यात आले. सभेत झालेल्या निर्णयाची प्रत संगणक परिचालकाला देणे अपेक्षित असताना कोणतीही प्रत न देता बनावट पत्र तयार करून गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले. सदस्यांनी स्वतःचेच बयान देत कामावरून कमी करण्याचा ठराव घेण्यात आला. आपल्यावर कोणते आरोप आहेत, याची माहिती मागून देखील देण्यात आली नाही. आपले सरकार सेवा केंद्र अंतर्गत केंद्रचालकांचा शिस्तभंगाबाबत मार्गदर्शन सूचना अन्वये प्रथम अपिलाचा अनुषंगाने गटविकास अधिकारी यांच्या चौकशीअंती संगणक परिचालक निर्दोष आढळले. त्यामुळे संगणक परिचालक यांना कामावरून कमी करण्याबाबतची केलेली कार्यवाही फेटाळण्यात आली असे असतानाही संगणक परिचालक महिलेला ग्राम पंचायतीत बसू देण्यात येत नाही.यावर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील आदेश देवूनही सरपंच आणि ग्राम पंचायत अधिकारी हेकेखोरपणे वागत असल्याचा आरोप होत आहे.

## आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामाचे भूमिपूजन



**सडक अर्जुनी –** तालुक्यातील पळसगांव/राका येथे ५५.५० लाख रुपयांच्या निधीतून नवीन आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामाचे भूमिपूजन राज्याचे माजी मंत्री आणि आमदार राजकुमार बडोले यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंदिया जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य कविता रंगारी, पंचायत समिती सभापती चेतन वडगाये, पंचायत समिती सदस्य सपना नाईक, संरपंच भारती लोथे, उपसंरपंच शोभा येरपुडे, ग्राम पंचायत सदस्य कुवर मेश्राम, सुभाष कापगते, सविता मलेवार, अर्विंद सलामे, कुंदा सावरकर, पुजा कापगते, अशोक कापगते, खेमराज भेंडारकर, माजी सभापती गिरधारी हत्तीमारे, डॉ. अविनाश दोनोडे, उकज खेडकर, लक्षीकांत धानगाये, राजेश नंदागवळी, विवेक भेंडारकर, आत्माराम कापगते, तिलाराम कापगते, ललित डोंगरवार, रुपराम बावनकुडे, ग्रामसेवक शहारे ताई, मुकेश कापगते,राजकुमार उंदीरवाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जि प अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी, या आरोग्य उपकेंद्राच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधांचा लाभ मिळणार असून हे उपकेंद्र ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

## २७४ पोलिस कर्मचाऱ्यांचे स्थानांतरण

**गोंदिया–** पोलिस अधीक्षक कार्यालयात कर्मचारी ५ वर्ष सेवा दिल्यावरही अनेक वर्षापासून स्थानांतरणाच्या प्रतिक्षेत होते. नक्षलग्रस्त क्षेत्रात स्थानांतरणास पात्र असून ते शासनाच्या वेतनवाढीपासून वंचित होते.दरम्यान, पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांनी स्थानांतरण प्रकिया पादर्शनकपणे राबवून दोन दिवसात जिल्ह्यातील २७४ कर्मचाऱ्यांचे स्थानांतरण केले आहे. शासन धोरणानुसार नक्षलग्रस्त भागात शासकीय सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना दीडपट वेतन वाढीचा लाभ देण्यात येतो. पोलिस अधीक्षक कार्यालयात कार्यरत अनेक कर्मचाऱ्यांनी पाच वर्ष सेवा दिली आहे.

## जबलपूर–रायपूर नवीन इंटरसिटी एक्सप्रेस



**गोंदिया :** जबलपूरच्या मदन महल स्टेशनवरून छत्तीसगडची राजधानी रायपूरदरम्यान नवीन इंटरसिटी एक्स्प्रेस ट्रेन आता दररोज धावणार आहे. रेल्वे विभागाने याला हिरवी झेंडी दाखविली आहे. जबलपूरहून रायपूरला जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर होणार आहे. पंधरा दिवसांपूर्वीच रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव यांनी भोपाळ येथे रिवा–पुणे आणि जबलपूर–रायपूरदरम्यान नवीन दोन रेल्वे गाड्या सुरू करण्याची घोषणा केली. त्यानंतर तीन चार दिवसांतच या गाड्यांचे संभावित वेळापत्रकसुद्धा जाहीर केले होते. यामुळे महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड अशा तीन राज्यांतील प्रवाशांना दिलासा मिळाला होता. त्यानंतर आता रेल्वे बोर्डाने जबलपूर–रायपूर नवीन इंटरसिटी एक्स्प्रेस सुरू करण्याची घोषणा केली आहे. तसेच या गाडीचे संभावित वेळापत्रकसुद्धा जाहीर केले आहे. त्यानुसार ही गाडी जबलपूर मदन महलहून सकाळी ६:१० वाजता सुटेल त्यानंतर ती बालाघाट व गोंदिया मार्गे रायपूरला पोहोचणार आहे.

तर रायपूरहून दुपारी २:४५ वाजता सुटून रात्री १०:३० वाजता मदन महलला पोहोचेल. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील प्रवाशांसह मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या प्रवाशांनासुद्धा या गाडीचा लाभ होणार असल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या गाडीचे फायनल वेळापत्रक लवकर जाहीर होणार असल्याचे रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले.सुरू करण्याची घोषणा केली आहे. तसेच या गाडीचे संभावित वेळापत्रकसुद्धा जाहीर केले आहे. त्यानुसार ही गाडी जबलपूर मदन महलहून सकाळी ६:१० वाजता सुटेल त्यानंतर ती बालाघाट व गोंदिया मार्गे रायपूरला पोहोचणार आहे. तर रायपूरहून दुपारी २:४५ वाजता सुटून रात्री १०:३० वाजता मदन महलला पोहोचेल. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील प्रवाशांसह मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या प्रवाशांनासुद्धा या गाडीचा लाभ होणार असल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या गाडीचे फायनल वेळापत्रक लवकर जाहीर होणार असल्याचे रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले.

### रायपूर–जबलपूर प्रवास ६ तास ४० मिनिटांत

नवीन इंटरसिटी एक्स्प्रेसमुळे जबलपूर–रायपूर हा प्रवास केवळ ६ तास ४० मिनिटांत पूर्ण होणार आहे. सध्या चालणाऱ्या अमरकंटक एक्स्प्रेसला हेच अंतर गाठण्यासाठी जवळपास ७ तास लागतात. त्यामुळे प्रवाशांचा २ तास २० मिनिटांचा वेळ वाचविण्यास मदत होईल.

### जबलपूर–रायपूर इंटरसिटी एक्स्प्रेसचे अशी असेल रचना

या नव्या ट्रेनमध्ये एकूण १५ एलएचबी कोच राहणार आहेत. यात १ एसी चेयर कार, ४ आरक्षित द्वितीय श्रेणी, ८ जनरल, १ एसएलआर आणि १ जनरेटर कोच असणार आहेत. नवीन इंटरसिटी एक्स्प्रेसमुळे जबलपूर–रायपूर मार्गावरील प्रवाशांना जलद, सोयीस्कर आणि कन्फर्म सीटसह प्रवासाची मोठी सुविधा मिळणार आहे.

# स्थलांतरीत मजुरांच्या हिवताप रक्त तपासणीत १३ नमुने दुषित



**गोंदिया :** जिल्ह्याच्या सिमेला लागून मध्यप्रदेश व छत्तीसगढ राज्य आहेत. तसेच गडचिरोली जिल्ह्याची सिमाही लागून आहे. दरवर्षी जिल्ह्यातील मजूर हे तेंदूपत्ता, पत्ता सीजन, बास कटाई, बांधकाम, रस्ता कामे व इतर विविध कामानिमित्त स्थलांतर करीत असतात. अशात आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. शिवाय स्थलांतरीत मजूर हे सीमा भागात जंगलव्याप्त परिसरात वास्तव्यास असल्याने किटकजन्य आजाराचा हिवताप संसर्गाचा धोका अधिक असतो. त्यामुळे आरोग्य विभागाच्या वतीने पुढाकार घेत स्थलांतरीत मजुरांचा शोध घेवून त्यांची हिवताप रक्त तपासणी करण्यात आली. अशा ४४९८ मजुरांची रक्त तपासणी करून प्रयोगशाळेला पाठविण्यात आले होते. यातील १३ नमुने हिवताप दुषित आढळल्याची माहिती आहे.

सिमावर्ती भागात मोठ्या प्रमाणात मजुरांचे रोजगारासाठी स्थलांतर होत असते. तेंदूपत्ता, पत्ती सीजन, बास कटाईसह अनेक कामांसाठी मजुर छत्तीसगढ, मध्यप्रदेश राज्यासह गडचिरोली जिल्ह्यात जात असतात. जंगलव्याप्त परिसरात मजुरांचे महिनोमहिने वास्तव असतो. यामुळे किटकजन्य व हिवताप संसर्गाचा धोका नाकारता येत नाही. कामदरम्यान मजुरांकडून आरोग्याकडेही दुर्लक्ष होते.

तर दुसरीकडे सीजन संपल्यानंतर हे मजुर स्वगावी परत येतात. यामुळे जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने हिवताप व संसर्गजन्य आजाराचा धोका लक्षात घेवून स्वगावी परतेल्या मजुरांचा शोध घेवून त्यांची रक्त व आरोग्य तपासणी केली जात आहे.

यासाठी आरोग्य पथक कार्यरत करण्यात आले आहे. जिल्ह्यातून यावर्षी जवळपास १२२८९ स्थलांतरीत मजुर जिल्ह्याबाहेर कामानिमित्त गेले होते. त्यापैकी ४४९८ मजुर स्वगावी परतले आहेत. या ४४९८ मजुरांची आरोग्य विभागामार्फत रक्त तपासणी करण्यात आली.

या तपासणीच्या अहवालात १३ लोकांचे नमुने हिवताप दुषित आढळल्याचे समोर आले आहे. यावर उपचार सुरू करण्यात आले असून आरोग्य विभागाकडून लक्ष दिले जात आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी ९९०० स्थलांतरीत मजुरांची रक्त तपासणी करण्यात आली होती. यातील ९३ लोक हिवताप दुषित आढळले होते.

**तालुकानिहाय स्थलांतरीत मजूर**

जिल्ह्यात मागील वर्षी ९९०० स्थलांतरीत मजुरांची रक्त तपासणी दरम्यान ९३ लोक हिवताप दुषित आढळले होते. जिल्ह्यात प्रामुख्याने हिवतापाचा शिरकाव स्थलांतरीत मजुरांपासुन होत असतो. ह्यावर्षी १२२८९ स्थलांतरीत मंजुर हे बाहेरगावी कामानिमित्त गेले होते. यामध्ये गोंदिया तालुक्यातून १०१८, तिरोडा तालुक्यातून ६८०, आमगाव तालुक्यातून २७९१, गोरेगाव तालुक्यातुन १२३३, देवरी तालुक्यातून १५६५, सडक अर्जुनी तालुक्यातून १२८२, सालेकसा तालुक्यातून २३४५ व अर्जुनी मोरगाव तालुक्यातून १३७५ लोक बाहेरगावी गेले असल्याची माहीती हिवताप विभागाचे आशिश बल्ले यांनी दिली आहे. सद्यस्थितीत ४४९८ लोक स्वगावी आपल्या जिल्ह्यात परतले आहे.

**आरोग्य विभाग सक्रिय**

आरोग्य विभागामार्फत आशा सेविका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका यांचे मार्फत स्थलांतरीत मंजुराचा शोध घेवुन गावात आल्याबरोबर त्यां लोकांची हिवताप चाचणी संबंधाने आरडीके.(जलद ताप सर्वेक्षण कीट) द्वारे रक्त तपासणी करीत आहे. आरोग्य कर्मचारी दिवस रात्र एक करुन गावोगावी गृहभेटीतुन स्थलांतरीत मजुरांचे रक्त तपासणी करण्यात व्यस्त असल्याचे दिसत आहे. तरी परतीच्या वेळी आल्यानंतर कुठलेही ताप सदृश्य किंवा इतर लक्षणे आढळून आल्यास रक्ताची तपासणी करून घेण्याबाबतचे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी केले आहे.